

केंद्रीय मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम 25 जानेवारीला

(पान २ वर)

दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक



अजित काका, माझ्या शाळेत पाणीही नाही: बीडमधील ZP शाळेची दयनीय अवस्था..

(पान ८ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ E-mail : divyawatanngp@gmail.com गुरुवार दिनांक २२ जानेवारी २०२६ अंक : १६८ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८

## महत्त्वाचे...

### गळ्यात कांद्याची माळ, डोळ्यात अश्रू



माढा तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी मोठी धावपळ आणि राजकीय चढाओढ पाहायला मिळाली. अनेक उमेदवारांनी अर्ज भरले तर काहींनी बंडखोरीचे निशाण फडकावले. मात्र या सर्व गर्दीत मानेगाव जिल्हा परिषद गटातील शेतकरी पुत्र विश्वजीत पाटील यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शेतीमालाच्या दराबाबतची व्यथा मांडण्यासाठी गळ्यात चक्क कांद्याची माळ घालून ते उमेदवारी अर्ज भरण्यासाठी पोहोचले. यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना त्यांना अश्रू अनावर झाले, त्यांच्या या अनोख्या आंदोलनात्मक उमेदवारीची सध्या संपूर्ण तालुक्यात जोरदार चर्चा सुरू आहे.एका वृत्तवाहिनीला बोलताना उमेदवार विश्वजीत पाटील यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. गेल्या 10 वर्षांपासून एकट्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर रस्त्यावरची लढाई लढत असताना कोणाचीही साथ न मिळाल्याची खंत व्यक्त करताना त्यांना अश्रू अनावर झाले. कांदा हे शेतकऱ्यांचे खरे आभूषण आहे, असे सांगत त्यांनी गळ्यात कांद्याच्या माळा घालून सध्याच्या विदारक स्थितीकडे लक्ष वेधले. बँकांकडून कर्ज मिळण्यात होणाऱ्या अडचणी आणि वाढत्या शेतकरी आत्महत्या या गंभीर समस्यांकडे लक्ष वेधत, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी ही लढाई असल्याचे पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले.

### साताऱ्यात भाजपाचा 'एल्गार'



सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस बुधवारी होता. सकाळपासून इच्छूकांनी शक्तीप्रदर्शन करत आपला अर्ज दाखल केल्याने अर्ज स्वीकृती केंद्रावर गर्दी झाली होती. सातारा जिह्यात भाजपाने तब्बल 60 ठिकाणी जिल्हा परिषदेसाठी अर्ज भरले असून पंचायत समितीसाठी 118 ठिकाणी अर्ज भरले आहेत.एकनाथ शिंदे गटाचे नेते एबी फॉर्म वाटून चक्क आजारी पडल्याने माहिती समजू शकली नाही. राष्ट्रवादी शरद पवार गटाने 18 जिल्हा परिषद गट आणि 26 गणात उमेदवार उभे केले आहेत. राष्ट्रवादी अजितदादा गटानेही अर्ज मोठया संख्येने भरलेले आहेत. त्यांची आकडेवारी समजू शकली नाही. दरम्यान, अर्ज छाननी दि. 22 रोजी असून दि. 23 ते 27 दरम्यान अर्ज मागे घेण्याची मुदत असल्याने त्या दरम्यान निवडणूकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.सातारा जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी सातारा आणि जावली तालुक्यात संभाजीनगरमधून विजया साळूंखे, परळीतून वसंतराव भंडारे, कारीतून शोभा लोटेकर, निनाम मधून प्रमिला सुतार, शेंद्रेतुन कोमल दळवी, वर्णेतुन साक्षी माने, अपशिंगेतून मानसिंग मोरे, नागठाणेतून राजेंद्र ढाणे, अतितमधून सुषमा जाधव यांना तिकीट दिले असून त्यांनी उमेदवारी अर्ज सादर केलेला आहे.

# भाजपचा शिंदेंना सूचक इशारा फडणवीसांसमोर कुणाची चाल चालणार?

दिव्य वतन /वृत्तसेवा



मुंबई- कल्याण डोंबिवली महापालिकेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने मनसेला सोबत घेऊन भाजपवर कुरघोडी केल्याचा दावा केला जात आहे. पण भाजप आमदार प्रवीण दरेकर यांनी शरद पवारांना राजकीय दृष्ट्या चित करणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापुढे कोण काय खेळी करणार? असा सवाल उपस्थित करत एकप्रकारे शिंदे गटालाच निर्वाणीचा इशारा दिला आहे.

कल्याण डोंबिवली महापालिकेत मनसेने शिंदे गटाला पाठिंबा दिला आहे. या माध्यमातून शिंदे गटाने भाजपवर राजकीय कुरघोडी केल्याचा दावा केला जात आहे. या घटनाक्रमावर आता भाजप नेत्यांमधून प्रतिक्रिया येत आहेत. भाजप आमदार प्रवीण दरेकर यांनी या प्रकरणी उपरोक्त सूचक विधान करत महायुती सरकारमधील आपला मित्रपक्ष असणाऱ्या शिंदे गटाला निर्वाणीचा इशारा दिला आहे.

प्रवीण दरेकर म्हणाले, कल्याण डोंबिवलीतील घटनाक्रम हा भाजपला धक्का असल्याचे मानण्याचे कोणतेही कारण नाही. शिवसेनेला त्यांचा पक्ष वाढवण्याचा अधिकार आहे. आम्ही निवडणुकीपुरते एकमेकांविरोधात असतो. पण निवडणुकीनंतर शहराच्या विकासासाठी कुणी समर्थन देत असेल आणि पाठिंबा देत असेल तर घेतला जातो. शहराच्या विकासाच्या भूमिकेवर शिवसेना - शिवसेनेसोबत येणार असेल व महायुतीचा भाग बनत असेल तर त्याचे स्वागतच आहे.

खरेतर भाजप - शिवसेना महायुतीचे तिथे निर्विवाद बहुमत आहे. त्यामुळे सत्ता स्थापन करण्याची कोणतीही अडचण नव्हती. पण शिवसेनेला पक्ष वाढवायचा असेल किंवा घटक पक्षांना सोबत घ्यायचे असेल तर काहीही अडचण नाही. निवडणुकीपूर्वी एकमेकांच्या पक्षातील नेते घ्यायचे नाही असे ठरले होते. ही वस्तुस्थिती आहे. तथापि, प्रत्येकाला आपला पक्ष वाढवण्याचा अधिकार आहे. पण महायुती अभेद्य असेल, असे ते म्हणाले.

कल्याण डोंबवलीत स्थापन होणारी सत्ता ही महायुतीचीच असेल. भाजप एक विशाल पक्ष आहे. त्यामुळे भाजपवर कुणीही काहीही बोलू शकत नाही. भाजप लोकांच्या जीवावरचा पक्ष आहे. त्यामुळे नेत्यांच्या खेळी, डावपेच हे भाजपसाठी दुय्यम ठरतात. आमचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. त्यांनी एखादी खेळी केली तर काय होते हे अवघ्या महाराष्ट्राला माहिती आहे.



## पहिल्या टी २० मध्ये भारताने न्यूझीलंडचा ४८ धावांनी पराभव केला

### अभिषेकच्या ८४ धावा, चक्रवर्ती-दुबेला २-२ विकेट

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर : भारताने पहिल्या टी-२० सामन्यात न्यूझीलंडचा ४८ धावांनी पराभव करून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. बुधवारी नागपूरमध्ये प्रथम फलंदाजी करताना भारताने २३८ धावा केल्या. प्रत्युत्तरात, किवी संघाला फक्त १९० धावा करता आल्या. अभिषेक शर्माने ८४ धावा केल्या, तर वरुण चक्रवर्ती आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

व्हीसीए स्टेडियमवर भारताकडून रिंकू सिंगने ४४, कर्णधार सूर्यकुमार यादवने ३२ आणि हार्दिक पंड्या यांनी २५ धावा केल्या. अर्शदीप सिंग, हार्दिक पंड्या आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. न्यूझीलंडकडून जेकब डफी आणि काइल जेमीसन यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

(सविस्तर वृत क्रीडा पानावर)

## फुलंब्रीत काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा मोठा राडा!:खासदार कल्याण काळेंच्या कार्यालयावर चढवला हल्ला; निष्ठावंतांना डावलल्याचा आरोप

दिव्य वतन /वृत्तसेवा

फुलंब्री- जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या उमेदवारी वाटपावरून फुलंब्रीमध्ये काँग्रेस पक्षांतर्गत धुसफूस उफाळून आली असून, संतापलेल्या कार्यकर्त्यांनी थेट खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाला लक्ष्य केले. निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलल्याचा गंभीर आरोप करत आक्रमक कार्यकर्त्यांनी कार्यालयात शिरून फर्निचरची मोठी तोडफोड केली आणि जोरदार घोषणाबाजी करत राडा केला. निवडणुकीच्या रणधुमाळीत भरदिवसा घडलेल्या या हिंसक प्रकारामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, काँग्रेसमधील अंतर्गत वाद आता चव्हाट्यावर आले आहेत.तिकीट वाटपातील कथित आर्थिक गैरव्यवहार आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांना मिळणारी दुय्यम वागणूक, हेच कार्यकर्त्यांच्या या तीव्र संतापाचे मुख्य कारण असल्याचे समोर येत आहे. पाल जिल्हा परिषद गटातून माजी युवक काँग्रेस अध्यक्ष वरुण पाथ्रीकर यांच्यासारख्या एकनिष्ठ कार्यकर्त्याला डावलून शेवटच्या क्षणी ज्ञानेश्वर जाधव यांना संधी देण्यात आल्याने, तसेच बाबरा गटात अजिनाथ सोनवणे यांना आश्वासन देऊनही ऐनवेळी डावलल्याने कार्यकर्त्यांच्या संयमाचा बांध सुटला. "पैसे घेऊन उमेदवारी विकली जात असून हे काँग्रेस पक्ष संपवण्याचे कारस्थान आहे," असा थेट आणि गंभीर आरोप करत कार्यकर्त्यांनी पक्षनेतृत्वाच्या भूमिकेबद्दल तीव्र संताप व्यक्त केला आहे.



## शिरूरमध्ये २५ कोटींचे ड्रग्स जप्त!:अहिल्यानगरमधील पोलिस कर्मचाऱ्यानेच पुरवला माल, आरोपीच्या खुलाशाने खळबळ

दिव्य वतन /वृत्तसेवा

पुणे ग्रामीण पोलिसांनी शिरूर परिसरात धडक कारवाई करत तब्बल 25 कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले असून या प्रकरणाला आता धक्कादायक वळण मिळाले आहे. यातील मुख्य आरोपीने अमली पदार्थांचा पुरवठा अहिल्यानगरमधील एका पोलिस कर्मचाऱ्यानेच केल्याचा खळबळजनक खुलासा केला आहे. या गंभीर घटनेवर प्रतिक्रिया देताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी तीव्र चिंता व्यक्त केली असून, जर पोलिसांकडूनच ड्रग्समाफीयांना साथ दिली जात असेल तर राज्यासाठी नक्कीच ही धोक्याची घंटा मानावी लागेल. या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.



रोहित पवार यांनी ट्विट करत म्हटले की, 18 तारखेला रात्री उशिरा पुणे ग्रामीण पोलिसांनी शिरूरमधील एका गॅरेज चालकाकडे तब्बल 2 कोटी पेक्षा जास्त किमतीचे एक किलो मेफेड्रॉन तर इतर दोघांकडे 9 किलो असे एकूण तब्बल 25 कोटीचे ड्रग्स पुणे पोलिसांनी पकडले आहे. यातील प्रमुख आरोपीने अहिल्यानगरमधील एका पोलिस कर्मचाऱ्याने त्याला ड्रग्स पुरवल्याची माहिती दिली असल्याचे समजते. त्यामुळे सापडलेले ड्रग्स हे अहिल्यानगर नार्कोटिक्स गोडाऊनमधील असल्याचा संशय निर्माण होत आहे.पुढे रोहित पवार म्हणाले, याच प्रकरणात काल नगर मधील LCB शाखेतील नार्कोटिक टेबल सांभाळणाऱ्या एका पोलिस कर्मचाऱ्याला पुणे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अशा प्रकारे जर पोलिसांकडूनच ड्रग्समाफीयांना साथ दिली जात असेल तर राज्यासाठी नक्कीच ही धोक्याची घंटा मानावी लागेल. हा प्रकार अत्यंत गंभीर आहे त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून पोलिसांच्या प्रतिमेला डाग लावणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, ही विनंती, असे पवारांनी म्हटले आहे.

## राज्यात विरोधक, अकोल्यात मैत्री?:सत्तेसाठी भाजपकडून ठाकरेंच्या शिवसेनेला युतीची साद; बहुमतासाठी अडले

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष महापौर निवडीकडे लागले असून, अकोला महानगरपालिकेत त्रिशंकू स्थिती निर्माण झाल्याने सत्तेसाठी नवीन समीकरणे उदयाला येत आहेत. कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने अकोल्यात सत्तेचा पेच निर्माण झाला असतानाच, भाजपने चक्क शिवसेना ठाकरे गटाला युतीची खुली ऑफर दिल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.



राज्यात हे दोन्ही पक्ष एकमेकांचे कट्टर राजकीय विरोधक असले, तरी अकोल्यात स्थानिक सत्तेसाठी हे दोन पक्ष एकत्र येण्याची शक्यता निर्माण झाली असून, या संभाव्य युतीमुळे अकोल्याच्या राजकारणात नवी वळणे येण्याची चिन्हे दिसत आहेत.

अकोला महानगरपालिकेत बहुमताचा 41 हा आकडा गाठण्यासाठी भाजपने शिवसेना ठाकरे गटाला थेट सत्तेची साद घातली असून, भाजपचे माजी महापौर विजय अग्रवाल आणि ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांच्यात झालेल्या महत्त्वाच्या बैठकीने या संभाव्य युतीवर आता शिक्कामोर्तब झाले आहे. 80 सदस्यीय महापालिकेत 38 जागांसह भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला तरी, बहुमतासाठी त्यांना अजून 3 जागांची आवश्यकता आहे. अशा स्थितीत ठाकरे गटाचे 6 नगरसेवक किंगमेकरच्या भूमिकेत असून, ही युती झाल्यास हा आकडा 44 वर पोहोचून सत्ता स्थापनेचा मार्ग सुकर होणार आहे. राज्यात तीव्र राजकीय संघर्ष सुरू असताना अकोल्यातील ही स्थानिक तडजोड राज्याच्या राजकारणात चर्चेचा विषय ठरत आहे.

भाजपने शिवसेना ठाकरे गटाकडे मदतीचा हात मागितला असून, त्या बदल्यात ठाकरे गटाने उपमहापौरपद आणि स्थायी समिती सभापती पदाची महत्त्वाची मागणी लावून धरली आहे. या प्रस्तावावर भाजपच्या गोटात सध्या विचारविनिमय सुरू असतानाच, दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये एक गुप्त बैठक पार पडली असून त्यात शहराच्या विकासाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे.या राजकीय घडामोडींवर भाष्य करताना ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांनी स्पष्ट केले की, शहराच्या विकासाच्या मुद्द्यांवर जो पक्ष सकारात्मक भूमिका घेईल.

# देवेंद्रजी पिकनिकला माझ्याशिवाय जाऊच शकत नाहीत

## दावोस दौऱ्यावरून अमृता फडणवीसांचे मिश्किल वक्तव्य, मुंबईच्या महापौराबाबतही सूचक विधान

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर : राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष मुंबईच्या महापौरपदाकडे लागले आहे. मुंबईचा महापौर भाजपचा होणार की शिंदे गटाचा? आणि तो मराठी असेल की अमराठी? या चर्चांना उधाण आले असतानाच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी मोठे विधान केले आहे. "मुंबईचा महापौर हा महायुतीचा आणि मराठी माणूसच होणार," असे सांगत त्यांनी या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच, मुख्यमंत्र्यांच्या दावोस दौऱ्यावरून टीका करणाऱ्या संजय राऊतांनाही त्यांनी प्रत्युत्तर देत, मिश्किल वक्तव्य केले.

मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपने ८९ जागा जिंकून मोठे यश मिळवले असले तरी, सत्तास्थापनेसाठी त्यांना एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची साथ अनिवार्य आहे. महापौर भाजपचा की शिवसेनेचा, यावरून चर्चा सुरू असतानाच अमृता फडणवीस यांनी 'मराठी महापौर' होणार असल्याचे सांगून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. महायुतीमधील मराठी नगरसेवकांपैकीच एकाला हे पद मिळेल, असे संकेत त्यांच्या विधानातून मिळत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दावोस दौऱ्यावर खासदार संजय राऊत यांनी 'पिकनिक' म्हणून टीका केली होती. या टीकेचा समाचार घेताना अमृता फडणवीस यांनी आपल्या खास शैलीत उत्तर दिले. त्या म्हणाल्या, "मुख्यमंत्री दावोसला पिकनिकसाठी गेलेले नाहीत. ते महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक आणण्यासाठी आणि राज्याला जागतिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी गेले आहेत. आर्थिक विकासासाठी हा दौरा अत्यंत महत्त्वाचा आहे."

संजय राऊतांना उत्तर देताना अमृता फडणवीस यांनी एक मिश्किल टोलाही लगावला. त्या म्हणाल्या, "राऊत म्हणतात तशी ही पिकनिक नाही. आणि मुळात, जर कधी ते खरोखरच पिकनिकला जाणार असतील, तर ते माझ्याशिवाय जाऊच शकत नाहीत!" त्यांच्या या उत्तरामुळे उपस्थित असलेल्यांमध्ये एकच हशा पिकला. या विधानातून त्यांनी राऊतांच्या टीकेतील हवाच काढून घेतली.

महाराष्ट्राच्या इकॉनॉमिक डेव्हलपमेंटसाठी मुख्यमंत्री अहोरात्र कष्ट घेत आहेत, असे सांगतानाच अमृता फडणवीसांनी विरोधकांनी केवळ टीकेसाठी टीका करू नये, असा सल्लाही दिला. मुंबई महापालिकेचा निकाल हा विकासाच्या बाजूने लागला असून, आता महायुतीचा महापौर बसल्यानंतर शहराच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.



# नागपुरात पेट्रोल पंप चालकाच्या घरातून १ कोटीचे हिरे २४७ तोळे सोने चोरीला

## ६५ लाख रोख रकमेसह एकूण २.९१ कोटींवर चोरट्यांनी केला हात साफ

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर :शहरात पेट्रोल पंप चालकाच्या बंगल्यातून अज्ञात चोरट्याने लाखो रुपयांची रोकड, हिरे,सोन्याचे दागिने चोरून नेले आहेत. विशेष म्हणजे सीसीटीव्ही झाकून ही चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने ६५ लाख रोख, १ कोटी रुपयांचे हिरे व २४७ तोळे सोन्यावर हात साफ केला आहे.

शिर्के लेआऊट येथील रहिवासी बलजिंदरसिंग इंद्रजितसिंग नय्यर (५६) आणि त्यांचा भाऊ शहरात पेट्रोल पंप व इतर व्यवसाय करतात. सोमवारी सायंकाळी बलजिंदरसिंग यांच्या धाकट्या मुलाचा साखरपुडा होता. कुटुंबातील सदस्य तिकडे गेले होते. चोरट्याने या संधीचा फायदा घेत मध्यरात्री स्वयंपाकघरातील खिडकीचे ग्रील तोडून आत प्रवेश केला. बलजिंदर यांच्या घरात कपाटाचे कुलूप तोडून २४७ सोन्याचे तसेच १ कोटीचे हिऱ्यांचे दागिने, रोख रक्कम पळवली.

सीसीटीव्ही झाकला तरीही एका कॅमेऱ्यात चोरटा कैद

मुलाचा साखरपुडा असल्याने बलजिंदर यांच्या कुटुंबीयांपैकी घरी कुणीही नव्हते. चोरट्याने घरात प्रवेश करण्यापूर्वी सीसीटीव्ही झाकून टाकला होता. मात्र सीसीटीव्ही झाकल्यानंतरही अन्य एका कॅमेऱ्यात आरोपी गुन्हा करताना कैद झाला. जप्त केलेल्या फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध सुरू आहे.



# केंद्रीय मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम २५ जानेवारीला

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी



नागपूर : केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. खामला चौकाजवळील ज्युपिटर शाळेच्या बाजूला मा. मंत्री महोदय यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. मा. मंत्री महोदय नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच (आवश्यक कागदपत्रे जोडून) आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने मा. मंत्री महोदयांना द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत ना. श्री. नितीन गडकरी आपल्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटतील.



नागपुरातील मनीष नगर अंडरपासच्या सुरुवातीला लावलेले बॅरीगेट्स आज एका लोडेड ट्रकमुळे पडले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. यामुळे मात्र अंडरपासने जाणारी वाहतूक प्रभावित झाली.

# श्री जोसेफ बास्टियन ने एनटीपीसी मौदा के परियोजना प्रमुख का कार्यभार संभाला

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

मौदा: एनटीपीसी मौदा ने अपने नए परियोजना प्रमुख के रूप में श्री जोसेफ बास्टियन का हार्दिक स्वागत किया है। श्री जोसेफ बास्टियन ने दिनांक 19 जनवरी 2026 को एनटीपीसी मौदा के परियोजना प्रमुख के रूप में औपचारिक रूप से कार्यभार ग्रहण किया। इससे पूर्व वे सिंगरौली में एनटीपीसी की सीजीएम (ओ एंड एम) के पद पर कार्यरत थे। श्री बास्टियन ने वर्ष 1991 में एनटीपीसी में अपनी सेवाएं प्रारंभ की थीं।

उन्होंने केरल विश्वविद्यालय, तिरुवनंतपुरम से इंस्ट्रुमेंटेशन में डिग्री प्राप्त की है। अपने लंबे और समृद्ध कार्यकाल के दौरान उन्होंने फरक्का, कायमकुलम, सिद्धिरगंज, कुडगी तथा सिंगरौली जैसी महत्वपूर्ण परियोजनाओं में उल्लेखनीय योगदान दिया है। इसके अतिरिक्त, उनके पेशेवर अनुभव में सी एंड आई मेंटेनेंस, ओ एंड एम तथा फेज डाइक मेंटेनेंस से जुड़े अनेक महत्वपूर्ण दायित्वों का सफल निर्वहन शामिल है।

एनटीपीसी मौदा को विश्वास है कि श्री जोसेफ बास्टियन के कुशल नेतृत्व में परियोजना अपने साझा लक्ष्यों और उद्देश्यों को प्राप्त करने की दिशा में नई ऊँचाइयों को छुएगी।

# अल्पसंख्याकांच्या सक्षमीकरणासाठी जिल्हास्तरीय कल्याण समितीची पुनर्रचना

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर : राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी तसेच त्यांच्या समस्यांचे प्रभावी निराकरण करण्याच्या उद्देशाने महत्त्वपूर्ण प्रशासकीय पाऊल उचलण्यात आले आहे. प्रधानमंत्री १५ कलमी कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय पातळीवर कार्यरत असलेल्या जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. यापूर्वी ही समिती जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत होती. मात्र, प्रशासकीय कार्यक्षमता वाढविणे, निर्णय प्रक्रियेत गती आणणे आणि तळागाळातील अल्पसंख्याक समाजाच्या प्रश्नांवर अधिक तत्परतेने कार्यवाही होण्यासाठी आता ही समिती निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत राहणार आहे. या बदलामुळे समितीच्या कामकाजात अधिक समन्वय, पारदर्शकता आणि परिणामकारकता येईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

या पुनर्रचित समितीत विविध महत्त्वाच्या घटकांचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे अल्पसंख्याक समाजाशी संबंधित योजनांची अंमलबजावणी अधिक समावेशक पद्धतीने होईल. या समितीमध्ये अल्पसंख्याक कल्याण अधिकारी, पंचायत राज संस्थांचे प्रतिनिधी, अल्पसंख्याकांसाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, लोकसभा सदस्य, विधानसभा सदस्य, राज्यसभा सदस्य, जिल्हा नियोजन अधिकारी आणि जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. या सर्व प्रतिनिधींच्या सहभागामुळे अल्पसंख्याक समाजाच्या गरजा, समस्या आणि विकासात्मक अपेक्षा अधिक प्रभावीपणे मांडल्या जातील आणि त्यावर समन्वयाने कार्यवाही होईल. तसेच, विविध विभागांमध्ये सुसूत्रता राखून अल्पसंख्याक कल्याणाच्या योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारकपणे होईल.

या महत्त्वपूर्ण प्रशासकीय निर्णयामागे महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष श्री. प्यारे खान यांचे विशेष प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरले आहेत. त्यांनी अल्पसंख्याक समाजाच्या हिताच्या दृष्टीने शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करून जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीची पुनर्रचना करण्याची मागणी केली होती. त्यांच्या पुढाकारामुळेच ही पुनर्रचना शक्य झाली आहे.

या संदर्भात प्रतिक्रिया देताना प्यारे खान म्हणाले की, "अल्पसंख्याक समाजाचा सर्वांगीण विकास हा केवळ कागदावरील योजनांवर अवलंबून नसून त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून आहे. या पुनर्रचित जिल्हास्तरीय समितीच्या माध्यमातून तळागाळातील अल्पसंख्याक समाजाच्या समस्या सोडवून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. ही समिती अल्पसंख्याकांच्या हक्कांची संरक्षक आणि त्यांच्या प्रगतीची मार्गदर्शक ठरेल."

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत चिरव्हा शाळा सलग दुसऱ्यांदा विजयी

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी



मौदा - नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव दिनांक 19 व 20 जानेवारी 2026 ला WCL मैदान चणकापूर पंचायत समिती सावनेर येथे पार पडला. या जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी माननीय विनायक महामुनी यांचे हस्ते पार पडले.

यात सर्व तेरा तालुक्यातील 15 खेळ प्रकार व सहा सांस्कृतिक स्पर्धा प्रकार अत्यंत चुरशीच्या वातावरणात पार पडले. यात कनिष्ठ मुली खो-खो गटात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा चिरफा पंचायत समिती मौदा या चमुने सलग दुसऱ्यांदा जिल्हास्तरीय स्पर्धेत आपले अव्वल स्थान मिळवले व चषक पटकावला.

याबाबत सरपंच माननीय विनायक सहारे उपसरपंच माननीय चांगोजी हजारे तथा शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रोशन जी ठोंबरे यांनी मुख्याध्यापिका सुवर्ण ठोंबरे, क्रीडा शिक्षक श्रीकृष्ण नागरगोजे, बलवंत अतकरी व इतर सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. बोरगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री जुगलकिशोर बोरकर यांनी केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेपासूनच या विद्यार्थ्यांना खो-खो खेळाबाबत उपयोगात येणारी नियम व कौशल्यबाबत सतत मार्गदर्शन केले. पंचायत समिती स्तरावरही माननीय गटशिक्षणाधिकारी संकेत जी मरस कोल्हे विस्तार अधिकारी सौ चामट श्री भक्तवरती यांनीही अभिनंदन केले.

# स्वामी विवेकानंद जयंती निमित्त अखिल भारतीय ग्राहक पंचायत नागपूर जिल्हा व महानगर तर्फे 'समर्पण दिवस' कार्यक्रम संपन्न : युवाच देशाचे भवितव्य - डॉ. विलास देशपांडे

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर : युवा मंनेच भवितव्य घडवू शकतात असे स्वामी विवेकानंद सांगत असत त्यांचे विचार आजही प्रासंगिक व उपयोगी आहेत. युवावस्था आणि वय याचा संबंध नसतो. मन युवा असले तर युवावस्था कायम असते हाच उत्साह आणि ऊर्जा देशाचे भवितव्य घडवीत असतात असे प्रतिपादन विवेकानंद केंद्राचे संचालक तथा व्ही.एन.आय.टी चे निवृत्त प्राध्यापक डॉ. विलास देशपांडे यांनी केले

अखिल भारतीय ग्राहक पंचायत, नागपुर जिल्हा व महानगर कार्यालय लेंड्रा पार्क, रामदास पेठ येथे आयोजित आदर्श सन्यासी योध्या स्वामी विवेकानंद जयंती निमित्त समर्पण दिवस आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते स्वामी विवेकानंद केंद्राचे संचालक मा. डॉ. विलासजी देशपांडे, प्रमुख अतिथी अ.भा. ग्राहक पंचायतचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य तथा प्रचार प्रसार आयाम प्रमुख अशोकजी त्रिवेदी, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य गजानन पांडे, नागपूर जिल्हा व महानगर कार्याध्यक्ष संजय धमाधिकारी उपस्थित होते.

काम करतांना नकारात्मकता असू नये आज आपल्या विचार विरोधी असणारे आपल्या विचारांचा होऊ शकतो. संवाद हा विनम्रपणे साधला पाहिजे. अपयशाने खचून न जाता काम केले पाहिजे असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यकर्ता कसा असावा संघटनेत कार्य करतांना कोणती मुल्ये अंगीकारावीत याबाबत मोलाचे विचार मांडले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे शुभहस्ते स्वामी विवेकानंद यांचे फोटोला माल्यार्पण व दिप प्रज्वलनाने झाली. त्यानंतर सर्व कार्यकर्ते यांनी स्वामी विवेकानंद यांचे फोटो समोर अर्थ समर्पण करण्यात आले. अ.भा.ग्राहक पंचायतचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य अशोकजी त्रिवेदी यांनी संघटनेचा इतिहास, ग्राहक संरक्षण कायद्याबददल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषणात संजय धर्माधिकारी यांनी नागपूर जिल्हा व महानगर मधील कार्य विस्तार, दररोजच्या ग्राहक समस्यांचे निवारण याबद्दल माहिती दिली. यावेळी अ.भा.ग्राहक पंचायतच्या जेष्ठ कार्यकर्त्या स्व. गौरीताई चांद्रायण यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. पाहुण्यांचा परिचय व कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागपूर महानगर अध्यक्ष अनिरुध्द गुप्ते, यांनी केले, पाहुण्यांचे स्वागत नागपूर जिल्हा अध्यक्ष गणेश शिरोळे यांनी केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सुत्रसंचलन महानगर उपाध्यक्ष समीर जोशी यांनी तर आभार नागपूर जिल्हा सचिव प्रकाश भुजाडे यांनी मानले.

या कार्यक्रमाला अ.भा. ग्राहक पंचायतचे जेष्ठ कार्यकर्ते सुधांशु दाणी, प्रमोद भागडे, किरण काळे, महानगर सचिव राजीव पुसदेकर, जिल्हा मार्गदर्शक विनयक इंगळे (हिंगणा), जिल्हा उपाध्यक्ष अजय काठोळे (कळमेश्वर), महानगर उपाध्यक्ष उदय दिवे, जिवन झाडे, जिल्हा उपाध्यक्ष



शेख बब्बुभाई (हिंगणा), सुधीर जोशी, महिला प्रमुख सौ. संध्याताई कुर्वे, निशिकांत ठोंबरे, आनंद मुळे यांचेसह नागपूर जिल्हा व महानगर पदाधिकारी तसेच नागपूर जिल्हयातील तालुक्यांचे पदाधिकारी व नागपुरातील गणमान्य नागरिक उपस्थित होते. असे कार्याध्यक्ष संजय धर्माधिकार यांनी कळविले.

## महत्त्वाचे...

### संकटग्रस्त पाणचिरा, भारतात राहिले फक्त 3 हजार



नागपूर :भारतात संकटग्रस्त पाणचिरा (Indian Skimmer) या पक्ष्याची संख्या केवळ ३ हजार असून, यापैकी सुमारे ९० टक्के पक्षी भारतात आढळतात. या दुर्मीळ पक्ष्याच्या संरक्षणासाठी बीएनएचएस (BNHS) आणि राष्ट्रीय स्वच्छ गंगा अभियान (National Mission for Clean Ganga) यांनी संयुक्त संवर्धन प्रकल्प सुरू केला आहे. हा प्रकल्प पाणचिरा पक्ष्याच्या अस्तित्वासाठी महत्त्वाचा मानला जात आहे. 'गंगा खोऱ्यातील पाणचिरा आणि समक्षेत्रिक पक्ष्यांच्या प्रजनन अधिवासांचे संरक्षण सामुदायिक सहभागाद्वारे करणे' असे या प्रकल्पाचे नाव आहे. बीएनएचएसद्वारे याची अंमलबजावणी केली जात आहे. नदीच्या वाळूच्या पट्ट्यांचे संरक्षण करणे हे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे, कारण हे पट्टे पाणचिरा आणि इतर नदीकाठच्या पक्ष्यांसाठी विणीच्या हंगामात महत्त्वाचे अधिवास ठरतात.हा प्रकल्प 'नमामी गंगा' कार्यक्रमाशी सुसंगत असून, नदीतील जैवविविधतेच्या संरक्षणासाठी संपूर्ण गंगा खोऱ्यात स्थानिक समुदायांच्या सहभागातून याची अंमलबजावणी केली जाईल. वाळू उत्खनन, नद्यांच्या प्रवाहात बदल, पाळीव प्राणी आणि भटक्या कुत्र्यांचा वावर यामुळे या पक्ष्यांची प्रजनन स्थळे नष्ट होत आहेत. या आव्हानांवर मात करण्यासाठी नियमित देखरेख, अधिवास संरक्षण आणि स्थानिक सहभाग महत्त्वाचा ठरेल. बीएनएचएसचे नदी पक्षी संवर्धन तज्ज्ञ व वरिष्ठ वैज्ञानिक परवीन शेख यांनी सांगितले की, "स्थानिक नागरिकांना 'घरटे संवर्धक' (Nest Guardian) आणि 'नदी संवर्धक' (River Guardian) म्हणून प्रशिक्षित केले जाईल.

### बाळपांडे पब्लिक स्कूलचे खेळाडू चमकले



बाळपांडे पब्लिक स्कूल च्या विद्यार्थ्यांनी २० जानेवारी २०२६ रोजी स्कूल ऑफ स्कॉलर्स येथे आयोजित "जोश अँड जश्न –आंतर-प्राथमिक शाळा क्रीडा महोत्सव" या आंतरशालेय स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होत विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता, कौशल्ये व शिस्त दाखवून दिली. त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण कामगिरीचे आयोजक व इतर शाळांच्या प्रतिनिधींनी विशेष कौतुक केले. या स्पर्धेदरम्यान शाळेचे क्रीडा शिक्षक राहुल गेडाम यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना नवीन अनुभव, मैत्री व संघभावना विकसित करण्याची संधी मिळाली. या सहभागामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, संघकार्य आणि सर्वांगीण विकास घडून आला. शाळेचे व्यवस्थापन व माननीय प्राचार्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी क्रीडा यशासाठी शुभेच्छा दिल्या.

# आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतील भव्य श्रीरामकथेला अलोट गर्दी

## पूज्य राजन महाराजांच्या रसाळ वाणीने लखमापूर धाम भक्तिरसात चिंब

## 'रामधर्माचा' जागर; जनसागराचा अभूतपूर्व प्रतिसाद



दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

चंद्रपूर : गेल्या आठ दिवसांपासून चंद्रपूर नगरीत वाहाणारा भक्तीच्या कुंभमेळ्यात अलोट गर्दी होत आहे. राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून आयोजित लखमापूर धाम चांदा क्लब ग्राऊंडवरील भव्य श्रीरामकथेचा उद्या, गुरुवार दि. २२ जानेवारीला महाआरतीने दिमाखदार समारोप होईल. १४ जानेवारीपासून सुरू झालेल्या या ज्ञानयज्ञाने केवळ चंद्रपूरचेच नव्हे, तर विदर्भाचे आध्यात्मिक वातावरण चैतन्यमयी केले आहे. आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी राजकारणापलीकडे जाऊन समाजमनावर सुसंस्कारांची पेरणी करण्यासाठी केलेल्या या भव्य आयोजनाला जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. श्रीरामकथेचे आयोजन केवळ एक धार्मिक सोहळा नसून, एक सांस्कृतिक उपक्रम ठरत आहे. विशेष म्हणजे आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार हे सपत्नीक दररोज या कथेला उपस्थिती लावून इतरांनाही प्रेरणा देत आहे. "रामकथा ही समाजाला एकत्र बांधणारी आणि मूल्यसंवर्धन करणारी परंपरा आहे," हा त्यांचा विचार या कार्यक्रमाच्या भव्यतेतून प्रत्यक्ष साकारत आहे. पूज्य राजन महाराज यांच्या रसाळ वाणीतून रामानामाच्या घोषात मोठ्या भक्तीभावाने रामकथा रोज संपन्न होत आहे. या रामकथेला हजारो भाविक रामानामात राममय झाले आहेत.चंद्रपुरात सुरू असलेल्या रामकथेचे थेट लाईव्ह प्रक्षेपण सुरू असल्याने राज्यभरातील रामभक्तांना घरबसल्या कथाकार पूज्य राजन महाराज यांच्या ओजस्वी व अमृतमय वाणीचा थेट लाभ मिळत आहे. प्रसिद्ध प्रवचनकार पूज्य राजन महाराज यांनी आपल्या अमोघ वाणीने श्रीरामांच्या जीवनातील प्रसंग जिवंत केले. "धनासोबतच परमार्थाचीही साधना करा" हा त्यांनी दिलेला मंत्र चंद्रपूरकरांच्या मनावर कोरला गेला. बाललीला, सीता स्वयंवर, वनवास आणि



रामराज्याचे वर्णन करताना महाराजांच्या ओघवत्या शैलीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. विशेषतः आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी कथेच्या आयोजनात ठेवलेली शिस्त, भव्य व्यासपीठ आणि मनमोहक विद्युत रोषणाई यामुळे चांदा क्लब ग्राऊंडवर खऱ्या अर्थाने अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे. मकर संक्रांतीला श्रीरामकथेला प्रारंभ झाला. या आठ दिवसांत केवळ कथाश्रवणच झाले नाही, तर सामाजिक सलोख्याचेही दर्शन घडले. विविध समुदायांच्या नागरिकांनी एकत्र येऊन केलेली आरती हा या सोहळ्याचा विशेष भाग ठरला. आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाने चंद्रपूरच्या आध्यात्मिक इतिहासात एक सुवर्णपान जोडले जात आहे.

# अमरावती बाजारात सोयाबीनची आवक वाढली

## दिवसभरात 5808 क्विंटलचे व्यवहार, दरात तेजी कायम

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी



अमरावती येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. बुधवारी दिवसभरात तब्बल ५ हजार ८०८ क्विंटल सोयाबीनचे व्यवहार झाले. सध्या सोयाबीनला प्रतिक्विंटल ५२५० ते ५४०० रुपयांचा दर मिळत असून, दरातील तेजीमुळे शेतकरी खाजगी बाजाराला प्राधान्य देत आहेत.

यावर्षी अतिवृष्टी आणि पूरस्थितीचा सामना करूनही अनेक सोयाबीन उत्पादकांनी आपले पीक वाचवले. सुरुवातीला काही शेतकऱ्यांनी चांगल्या दराच्या प्रतीक्षेत सोयाबीन साठवून ठेवले होते. आता बाजारात चांगला दर मिळत असल्याने त्यांनी विक्रीसाठी आणण्यास सुरुवात केली आहे, ज्यामुळे आवक वाढली आहे.

केंद्र शासनाने यावर्षी सोयाबीनसाठी प्रतिक्विंटल ५ हजार ३०० रुपये आधारभूत मूल्य निश्चित केले आहे. बडनेरा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपकेंद्रात यासाठी शासकीय खरेदी केंद्रही उघडण्यात आले आहे. मात्र, शासकीय खरेदीनंतर रक्कम मिळण्यास विलंब होत असल्याने सोयाबीन उत्पादक खाजगी बाजारातच आपली विक्री करत आहेत.

बुधवारी अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत एकूण ७ हजार ३०६ क्विंटल धान्याची आवक झाली. यात सोयाबीन ५८०८ क्विंटल, तूर १०२३ क्विंटल, मका ३२१ क्विंटल, हरभरा ९१ क्विंटल, तीळ ४४ क्विंटल, उडीद १३ क्विंटल आणि गहू ६ क्विंटल यांचा समावेश होता. ही सर्व आवक २०७ वाहनांमधून झाली. ज्वारी आणि मूगाची आवक झाली नाही.

दरम्यान, 'पांढरं सोनं' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कापसालाही सध्या चांगला भाव मिळत आहे. अमरावतीमध्ये कापसाचे भाव प्रतिक्विंटल ७९०० ते ८१०० रुपये असून, सरासरी दर ८००० रुपये प्रतिक्विंटल आहे. जिल्ह्याच्या काही भागांत हा दर ७९०० ते ८०५० रुपयांपर्यंत नोंदवला गेला. गतवर्षीच्या तुलनेत हे दर अधिक असल्याने कापूस उत्पादकही समाधानी आहेत. बाजारातील आवक आणि कापसाच्या गुणवत्तेनुसार दरांमध्ये बदल होऊ शकतो.

# आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते होणार बुरकोनी (हिंगणघाट) येथे अभ्यासिकेचे लोकार्पण

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

चंद्रपूर - नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत शासकीय जागेवर उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक अभ्यासिकेचा लोकार्पण सोहळा शुक्रवार, दि. २३ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बुरकोनी (ता. हिंगणघाट, जि. वर्धा) येथे आयोजित करण्यात आला आहे. या अभ्यासिकेचे उद्घाटन राज्याचे माजी अर्थ, वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या शुभहस्ते होणार आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण आणि नियमित अभ्यासासाठी शांत, सुसज्ज व प्रेरणादायी वातावरण उपलब्ध व्हावे या उद्देशाने ७० लाख रुपयाची ही अभ्यासिका साकारण्यात आली आहे. आधुनिक सुविधा, अभ्यासासाठी पोषक रचना आणि विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन उभारलेली ही अभ्यासिका शिक्षण क्षेत्रात मोलाची भर घालणारी ठरणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यमंत्री मा. ना. डॉ. पंकज भोयर उपस्थित राहणार आहेत.

या लोकार्पण सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून खासदार अमर काळे, हिंगणघाट विधानसभेचे आमदार समीर कुणावार, आर्वी विधानसभेचे आमदार सुमित वानखेडे, देवळी मतदार संघाचे आमदार राजेश बकाने, आमदार दादाराव केचे, आमदार सुधाकर अडबाले, आमदार अभिजित वंजारी, माजी खासदार रामदास तडस, माजी आमदार, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे लोकप्रतिनिधी, विविध पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी तसेच ग्रामस्थ, विद्यार्थी व पालक तसेच शिक्षण, सामाजिक व सहकार क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दिशेने टाकलेले हे पाऊल निश्चितच दिशादर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत असून या लोकार्पण सोहळ्यास नागरिकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन बुरकोनी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नांदगाव नगरपंचायतीचे पाचही सभापती बिनविरोध

## आघाडीची सत्ता मजबूत, विकासाला गती मिळण्याचे संकेत

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी



नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीच्या सर्व पाचही विषय समित्यांच्या सभापतींची निवड बिनविरोध पार पडली आहे. तहसील कार्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या विशेष सभेत ही निवड प्रक्रिया पूर्ण झाली. या निवडीमुळे नगरपंचायतीच्या कामकाजाला नवीन ऊर्जा मिळेल आणि शहरातील मूलभूत सुविधा व विकासकामांना गती मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांमध्ये अर्थ व नियोजन समितीचे सभापती म्हणून अब्दुल जमीर अब्दुल रहीम, आरोग्य व स्वच्छता समितीच्या सभापती म्हणून ज्योत्स्ना अमोल धवस, सार्वजनिक बांधकाम समितीचे सभापती म्हणून मो. रियाज मो. मुमताज, पाणीपुरवठा व जलनिसारण समितीचे सभापती म्हणून वासुदेव अवधुतराव लोखंडे आणि महिला व बालकल्याण समितीच्या सभापती म्हणून कांता गजानन लोमटे यांचा समावेश आहे.

या समित्या शहरातील विविध महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये कार्य करतील. अर्थ व नियोजन समिती विकासकामांसाठी निधीचे योग्य नियोजन, अंदाजपत्रक आणि योजनांची अंमलबजावणी करेल. स्वच्छता समिती शहरातील आरोग्य व्यवस्था, कचरा व्यवस्थापन आणि साथीचे आजार रोखण्यासाठी उपाययोजना राबवेल.

सार्वजनिक बांधकाम समिती अंतर्गत रस्ते, गटारी आणि सार्वजनिक इमारतींसह विकासकामे वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी सांभाळेल. महिला व बालकल्याण समिती महिला सक्षमीकरण, बालकल्याण योजना आणि शिक्षण, आरोग्य व पोषणविषयक उपक्रमांवर लक्ष केंद्रित करेल, तर पाणीपुरवठा समिती शहराला सुरळीत पाणीपुरवठा सुनिश्चित करेल आणि सांडपाणी व्यवस्थापन सुधारेल.

या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष प्राप्ती मारोडकर होत्या. वरूड नगर परिषदेचे मुख्याधिकारी गजानन भोयर यांनी पिठासीन अधिकारी म्हणून कामकाज पाहिले, तर नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी निवृत्ती भालकर यांनी सहाय्यक पिठासीन अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळली. सर्व समित्यांच्या निवडीनंतर नवनियुक्त सभापतींचे नगराध्यक्षांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित नगरसेवकांनी नवनियुक्त सभापतींचे अभिनंदन करत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.या बिनविरोध निवडीमुळे नगरपंचायतीच्या सर्व विषय समित्या महाविकास आघाडीच्या ताब्यात आल्या आहेत.

# आर्वीत माथेफिरूचा हैदोस:भाजी बाजारात तिघांना काठीने बेदम मारहाण

## एका शेतकऱ्याची हत्या, अन्य दोघे गंभीर जखमी

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी



वर्धा जिल्ह्यातील आर्वी शहरात आज बुधवारी सकाळच्या सुमारास एका माथेफिरू युवकाने घातलेल्या उच्छादामुळे संपूर्ण परिसर हादरला आहे. शहरातील गजबजलेल्या इंदिरा भाजी मार्केट परिसरात एका २२ वर्षीय माथेफिरूने लाकडी काठीने केलेल्या अमानुष मारहाणीत एका ७० वर्षीय वृद्ध शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. शेतमाल विकण्यासाठी आलेल्या कष्टकऱ्यांवर असा जीवघेणा हल्ला झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आर्वी येथील रहिवासी असलेल्या मथुरेश उर्फ मत्या लाडके (वय २२) या माथेफिरू युवकाने नग्नावस्थेत आज सकाळी इंदिरा भाजी मार्केटमध्ये अचानक धुमाकूळ घातला. त्याच्या हातात एक मोठी लाकडी काठी होती. मार्केटमध्ये भाजीपाला आणि इतर शेतमाल घेऊन आलेले शेतकरी आपल्या कामात व्यस्त असताना मथुरेशने त्यांच्यावर हल्ला चढवला.

त्याने संजय रामकृष्ण राऊत (वय ७०) यांच्या डोक्यावर काठीने इतक्या जोरात प्रहार केले की, राऊत यांची यांची कवटी फुटून, मेंदू रस्त्यावर पडला होता. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. राऊत हे शेतकरी असून ते आपला माल विक्रीसाठी बाजारात आले होते.

दोन शेतकरी गंभीर जखमी

संजय राऊत यांच्यावरील हल्ल्यानंतर या माथेफिरूने तिथेच उपस्थित असलेले दुसरे शेतकरी रामराव महादेवराव वांगे (वय ८५) आणि शहजाद यांच्यावरही हल्ला केला. काठीने केलेल्या या जबर मारहाणीत हे दोघेही गंभीर जखमी झालेत. भरबाजारात सुरू असलेला हा थरार पाहून विक्रेते आणि ग्राहकांची एकच पळापळ झाली.

माथेफिरुने वृद्धाची निर्घृण हत्या केल्याची माहिती शहरात वाऱ्यासारखी पसरली. घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी आणि काही धाडसी तरुणांनी माथेफिरू मथुरेशला घेराव घातला आणि त्याला जागीच पकडले. माहिती मिळताच आर्वी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आरोपीला ताब्यात घेतले. त्याची मानसिक स्थिती बिघडलेली असल्याने त्याला सुरुवातीला उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात आले.

जखमींना सेवाग्राममध्ये हलवले

गंभीर जखमी झालेल्या रामराव वांगे आणि शहजाद यांना तातडीने आर्वीतील रुग्णालयात नेण्यात आले, मात्र त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना तातडीने वर्ध्यातील सेवाग्राम रुग्णालयात हलवण्यात आले आहे. हे दोघेही शेतकरी असून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी बाजारात माल घेऊन आले होते, मात्र या माथेफिरूच्या कृत्यामुळे त्यांच्यावर ही वेळ आली.

शहरात संतापाची लाट

दिवसभर गजबजलेल्या इंदिरा भाजी मार्केटमध्ये अशा प्रकारची क्रूर घटना घडल्याने आर्वी शहरात संतापाचे आणि भीतीचे वातावरण आहे. आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. या युवकाने नक्की कोणत्या कारणाने हा हल्ला केला, की केवळ मानसिक विकृतीतून हे कृत्य घडले, याचा सखोल तपास पोलिस करत आहेत.

## महत्त्वाचे...

### पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली 24 जानेवारीला डीपीसी सभा:



अमरावती जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला दिशा देणारी महत्त्वपूर्ण जिल्हा नियोजन समितीची (डीपीसी) सभा आगामी शनिवार, २४ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली आहे. या सभेत सन २०२६-२७ साठीचा विकास आराखडा निश्चित केला जाणार आहे.राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा शनिवारी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात सुरू होईल. चालू आर्थिक वर्षासाठी (३१ मार्च रोजी संपणारे) अमरावती जिल्ह्याचा विकास आराखडा ४७४ कोटी ७८ लाख रुपये आहे. त्यामुळे पुढील आर्थिक वर्षाचा विकास आराखडा निश्चितच ५०० कोटींच्या आसपास राहण्याची शक्यता आहे.

या बैठकीदरम्यान, विविध विभागांकडून करण्यात येणारी मागणी आणि लोकप्रतिनिधींकडून त्याला दिला जाणारा प्रतिसाद यानंतरच नेमका आकडा निश्चित होईल. तसेच, चालू आर्थिक वर्षात विविध यंत्रणांनी डिसेंबर अखेरपर्यंत केलेल्या खर्चाची पडताळणी करून त्यास मान्यता दिली जाईल.गेल्या २९ ऑगस्ट रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्ताला मान्यता देणे आणि पालकमंत्र्यांच्या सूचनेनुसार वेळेवर येणाऱ्या इतर विषयांवरही चर्चा करून योग्य ते निर्णय घेतले जातील. या सभेसाठी जिल्ह्यातील सर्व खासदार, आमदार आणि जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांना निमंत्रणे पाठवण्यात आली आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०२५-२६ साठी सुमारे १ हजार ११५ कोटी ८३ लाख ८८ हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. विविध यंत्रणांच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या आवश्यकतेनुसार ही मागणी केली होती, परंतु नेहमीप्रमाणे ती पूर्णपणे मान्य झाली नाही. गतवर्षीच्या रकमेत थोडीफार वाढ मिळण्याची शक्यता आहे.

### अचलपूरमध्ये मजुराचा खून, सहकारी मजुरावर गुन्हा दाखल




अचलपूर तालुक्यातील कविठा शेतशिवारात एका मजुराचा खून झाल्याची घटना उघडकीस आली आहे. २० जानेवारीच्या रात्री थ्रेशरच्या कामावरून झालेल्या वादातून सहकारी मजुरानेच विरू शिवकली मरस्कोल्हे (वय ४०) या मजुराची हत्या केली. याप्रकरणी अचलपूर पोलिसांनी भोंदू ब्रिजलाल कवडेकर (वय ३०) याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.या घटनेसंदर्भात बुंदेलपुरा, अचलपूर येथील पंकज प्रभाकर वानखडे (वय ३१) यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. पंकज वानखडे यांच्याकडे ट्रॅक्टर आणि थ्रेशर मशीन असून, त्यावर मजूर काम करतात. तुर काढणीचा हंगाम सुरू असल्याने त्यांनी काजलडोह (ता. चिखलदरा) येथील विरू मरस्कोल्हे आणि भोंदू कवडेकर या दोन मजुरांना कामासाठी बोलावले होते.

२० जानेवारी रोजी इक्बाल यांच्या शेतात थ्रेशरचे काम सुरू होते. सायंकाळी सुमारे ६ वाजता काम संपल्यानंतर दोन्ही मजूर रात्रीच्या मुक्कामासाठी कविठा रोडलगत असलेल्या गुरांच्या गोठ्याजवळ थांबले होते.

१ २ ३ ४ ५ ६

## राजकीय रणांगणात पुणे भाजपमय

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या निकालांनी शहराच्या राजकारणात बदल घडवून आणला. तब्बल नऊ वर्षांनंतर पार पडलेल्या या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने दमदार कामगिरी करत पुन्हा एकदा पुण्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. ही निवडणूक अजित पवार आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यातील प्रतिष्ठेची लढत म्हणून पाहिली जात होती. अखेर ही लढत भाजपच्या पारड्यात गेली. पुण्यातील सत्तासमीकरणे बदलणारा हा कौल असून, भाजपसाठी हा विजय राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा ठरला.राष्ट्रवादी कॉंग्रेस-कॉंग्रेस यांच्या आघाडीकडील पुणे महापालिकेची सत्ता भारतीय जनता पक्षाने २०१७ मध्ये हिसकावून घेतली, तेव्हा भाजपच्या यशाचे श्रेय काही वर्षांपूर्वी आलेल्या मोदी लाटेला देण्यात आले होते, मात्र त्यानंतर आता आठ वर्षे उलटल्यावर आणि दृश्य मोदी लाट नसतानाही भाजपने पुणे महापालिकेवर पुन्हा झेंडा फडकावला. तसेच उपनगरातही भाजपने जोरदार मुसंडी मारून आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. त्यामुळे राजकीय रणांगणात पुण्यात पुन्हा भाजपने विजय मिळवला. पुणे महापालिकेच्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने निर्विवाद बहुमत मिळवून 'विकासपर्वा'च्या दुसऱ्या अध्ययाला सुरुवात केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यासाठी दाखविलेले 'व्हिजन' आणि अभूतपर्व विजयानंतर जबाबदारी नव्या लोकप्रतिनिधींना असावी, अशीच प्रत्येकाची इच्छा आहे. भाजपला मिळालेले बहुमत केवळ प्रचाराचे नव्हे तर, अनेक महिन्यांपासून राबवलेल्या सूक्ष्म नियोजनाचे फलित ठरले. उमेदवार निवडीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वैयक्तिक लक्ष, स्पष्ट व्हिजन, मुरलीधर मोहोळ, चंद्रकांत पाटील यांच्याशी साधलेला समन्वय अशा अनेक घटकांमुळे भाजपने सत्ता अधिक बळकट केली. मुरलीधर मोहोळ यांनी प्रचारयंत्रणेची सूत्रे स्वत:कडे घेत सौम्य, पण परिणामकारक भाषेत अजित पवार यांच्याशी थेट राजकीय सामना केला. भाजपने प्रचाराचे मायक्रो प्लॅनिंग केलेले. ज्या ठिकाणी उमेदवार विजयी होण्याची शक्यता कमी वाटली त्याठिकाणी मुख्यमंत्र्यांच्या सभा घेण्यात आल्या. भाजपने या निवडणुकीत पक्षसंघटनेचा चांगला वापर करून घेतला. प्रत्येक प्रभागात घरोघरी जाऊन भाजप उमेदवार पोहोचवण्यात पक्षनेत्यांना यश आले. यासाठी संघाच्या यंत्रणेचा देखील फायदा करून घेण्यात आला. मतदानाच्या दिवशी मतदान जास्त होईल याची काळजीही घेण्यात आली. जाहीरनाम्यात देखील पुढच्या ५० वर्षांच्या विकासाचे व्हिजन मांडण्यात आले याचा फायदाही पक्षाला झाला. प्रत्यक्ष उमेदवारी अर्ज भरण्याची वेळ आली तेव्हा देखील योग्य रणनिती आखली. योग्य तेथे प्रभावी पक्षप्रवेश घडवून आणले. वडगाव शेरीत पठारे, वारजेमध्ये सचिन दोडके, सायली वांजळे, धनकवडीत बाळा धनवडे, यांचे पक्षप्रवेश भाजपसाठी निर्णायक ठरले. परिणामी जे प्रभाग भाजपसाठी कायम अवघड मानले जायचे त्या ठिकाणी भाजपचे उमेदवार निवडून आल्याने पक्षाची ताकद वाढली. अनेक माजी नगरसेवकांची नाराजी ओढवली पण, त्याचा विचार न करता सर्वाधिक महिलांना संधी देत विरोधकांना आव्हान दिले. भाजपच्या बहुतांश महिला उमेदवारांनी चांगली कामगिरी करत विजय मिळवला. विरोधकांच्या फुटीचाही भाजपला फायदा झाल्याचे पाहायला मिळाले. शहरात भाजप विरुद्ध राष्ट्रवादी असे चित्र निर्माण केले गेले त्यामुळे काही प्रभागात चौरंगी, पंचरंगी लढती झाल्या याचा फायदा भाजपला झालेला बघायला मिळाला. याउलट अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कॉंग्रेसचा पुण्यातील पाया पक्का असतानाही त्या पक्षाला निवडणूक चांगल्या प्रकारे खेळता आली नाही, असेच म्हणावे लागेल. एकतर अजित पवार यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस यांची आघाडी होणे, हीच या पक्षांची फार मोठी जमेची बाजू होती. शरद पवार यांची सभा, समाजमेळावे, पत्रकार परिषद या आघाडीच्या भल्यासाठी आवश्यक होती. सुप्रिया सुळे यांच्या उपस्थिती-अनुपस्थितीपेक्षा शरद पवार यांची अनुपस्थिती लक्ष वेधून घेणारी ठरली. त्यामुळे एकसंध राष्ट्रवादी निवडणुकीला सामोरी गेलीच नाही. निवडणुकीच्या निकालातील शिंदे शिवसेना आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या कामगिरीबाबत बोलण्यासारखे फारसे काही नाही. याचे कारण शिंदे सेनेची पुण्यात अजून संघटनात्मक बांधणी झालेली नाही. आयात उमेदवार तसेच नवे कार्यकर्ते यांच्या भरवशावर शिंदेसेनेने सव्वाशे जागा लढवल्या. त्यात संघटनावाढ झाली असण्याची शक्यता हाच फायदा झाला असेल. उबाठा आणि मनसेचे नेतृत्व मुंबईच्या महासंग्रामात गुंतलेले असल्याने त्यांचे पुण्याकडे दुर्लक्ष होणे स्वाभाविकच होते. राज ठाकरे यांचा शेवटचा रोड शो वगळता त्या पक्षाने जाहीर प्रचारात फारसा ठसा उमटवला नाही.

# पाण्याचे प्रदूषण धोकादायक

गेल्या आठवड्यात सावनेर तालुक्यातील खैरी ढालगाव येथील दूषित पाण्याचा मुद्दा बराच गाजला. गावातून खुद्द कन्हान नदी वाहत असतांना दूषित पाण्यामुळे काही लोकं आजारी पडल्याचे वृत्त वाऱ्यासारखे पसरले आणि कुंभकर्णी झोपेतून जागे व्हावे तशी प्रशासनाची नीज उडाली. आरोप प्रत्यारोपांच्या फैरीत आठवड्याभरात सर्व काही शांत झाले.

गेल्या काही काळापासून दूषित पाण्याचा मुद्दा राज्यात बऱ्याचदा उफाळून आलेला आहे. साधं नागपूरचंच उदाहरण घेतो म्हटल्यास कधीकाळी जीवनदायिनी असलेल्या नागनदीची गटारगंगा झाल्याचे चित्र आपण बघतो आहोत. नाग नदी इतकी दूषित झाली आहे की, जवळून जातांना सुद्धा नाक दाबून जावे लागते. वास्तविक नद्या, नाले, निर्झर हे पाण्याचे स्त्रोत काही मानवनिर्मित नाहीच. मानवाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी निसर्गाने निर्माण केलेले हे पाण्याचे स्त्रोत आहेत. मात्र, कृतघ्न माणसाने ज्या नद्यांनी तहान भागवली त्यांनाच दूषित करावे, हा कृतघ्नपणाचा कळस म्हणावा. कधीकाळी नागपूरचे भूषण असणाऱ्या नागनदीला आता पुन्हा जिवंत ( मरणप्राय झालेल्या ) करण्यासाठी केंद्रीय मंत्र्यांच्या माध्यमातून का असेना कुणी भगीरथ मिळाला, हेही नसे थोडके. नागनदी अशीच आपोआप दूषित झाली असेल काय? या प्रश्नाचे उत्तर शोधतांना शंभर पैकी शंभर बोटं आपल्याकडेच वळतील. एकीकडे नागपूर शहर फुगीर होत असतांना घरघरातून वाहणारे सांडपाणी, गटाराचे पाणी, कंपन्यांतून निघणारे रसायन हे सर्व नागनदीत सोडल्या गेले आणि परिणामी त्यातील जीवांचा संहार आपण केला. जेव्हा त्यात जलचरच राहणार नाही, तेव्हा पाणी स्वच्छ कसे असणार? आता हे झालं नागपूरचं. मात्र, देशातील गंगा, यमुना सारख्या नद्या सुद्धा दूषित झाल्या आहेत. यमुनेच्या पाण्यावर तरंगणारा फेस बघून त्यात किती रसायन मिसळले असावेत, याचा अंदाज लावता येतो. वास्तविक प्रत्येक कंपन्यांना सांडपाण्याची, रसायन युक्त पाण्याची विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे. घाणपाणी तसेच शौचालयाचे पाणी नदीत सोडण्याआधी त्यावर प्रक्रिया करावी लागते. तशी यंत्रणा प्रत्येक कंपनीत उभारावी लागते. मात्र, प्रदूषण मंडळ गाढ झोपेत असतांना ( कदाचित कर्मचाऱ्यांची कमतरता असू शकते ) कंपन्या आपले हात शेकून घेत असतील तर दोष कुणाला द्यायचा? कंपन्यांतून निघणाऱ्या पाण्यातून मानवास बाधक घटक वेगळे करून त्याचा पुनर्वापर करावा लागतो. मात्र, अनेक कंपन्या हा नियम मोडून सर्रास रसायन युक्त पाणी नद्यांत, सागरात सोडतात. परिणामी त्यातील जलचर मृत होऊन पाणी अशुद्ध होते. जे वापरण्याच्या कामास सुद्धा योग्य असत नाही. तर, पिण्यास कुठून वापरणार? आपणच आपल्या जीवन स्त्रोतांना असे दूषित करू तर, रोगराई नाही पसरणार तर काय? घरातला केरकचरा, निर्माल्य, मृत जनावरे, अर्ध जळालेला मृतदेह तसेच मेल्या माणसाचे आधी वापरातील वस्त्र, जैविक कचरा टाकून आपण स्वतःच नद्या किंवा अन्य पाण्याचे स्त्रोत स्वतःच प्रदूषित करतो आणि नंतर दूषित पाणी आल्यावर प्रशासनाच्या नावाने बोटं मोडतो. याच रासायनिक पाण्यामुळे आसपासच्या जमिनीवर सुद्धा प्रभाव पडून जमिनी नापीक होतात.

खैरी ढालगाव येथील प्रकरण निसर्गाच्या करणीने तापले नसून मानवाच्या चुकीमुळे घडले असे म्हणायला हरकत नाही. दरम्यान या दूषित पाण्यामुळे अकरा जणांना त्रास झाला असून त्यापैकी तीन जणांना रुग्णालयात भरती करण्यात आल्याची माहिती खुद्द नागपूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ विपीन इटनकर यांनीच दिल्याने, खैरी ढालगाव येथील पाणी दूषित झाले होते, हे नक्की. ही घटना घडण्याआधी मध्यप्रदेशातील इंदूर ( देशातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून ओळख असलेले) येथे भागीरथपुरा भागात दूषित पाणी प्यायल्याने ७ जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. त्यावेळी १०० पेक्षा जास्त पीडित नागरिकांना दवाखान्यात दाखल करण्यात आले होते, अशी माहिती स्थानिक महापौर पुष्यमित्र भार्गव यांनी दिली होती. मध्यप्रदेश सरकारने या प्रकरणाची दखल घेत दोन अधिकाऱ्यांना तडकाफडकी निलंबित केले आहे. आता ते अधिकारी जितके दोषी तितकीच जनता देखील दोषी नाही काय? पाणी दूषित करण्यात आपलाच हात असतो, ही बाब नाकारून चालणारी नाही.महाराष्ट्राच्या पर्यावरण आणि वातावरणीय मंत्री पंकजा ताई मुंडेंनी विधानपरिषदेत मांडलेल्या एका प्रश्नाला लेखी उत्तर देतांना म्हटले होते की, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण ( ? ) मंडळाने २०२५ मध्ये प्रकाशित केलेल्या अहवालानुसार देशातील २९६ प्रदूषित नदी पट्टे असून यातील सर्वात जास्त म्हणजे ५४ प्रदूषित नदी पट्टे हे एकट्या महाराष्ट्रात आहेत. यावरून आपण , आपल्या पूर्वजांनी किती नद्या प्रदूषित केल्या आहेत, याची कल्पना आहे. निसर्ग सर्वकाही नियंत्रित करतो. त्यानेच बनविलेले स्त्रोत स्वच्छ ठेवण्यासाठी त्याने त्या स्त्रोतांना कुठे उंचावरून तर कुठे सखल भागातून वाहत नेले. त्यात जलचर निर्माण केले. मात्र, आपण सर्वांचा सत्यानाश करून स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली. माणसाने स्वतःच्या स्वार्थापायी कित्येक नद्यांना प्रदूषित केले आहे, हे सत्य नाकारता येणारे नाही. अनेक ठिकाणी उभारण्यात आलेले सांडपाणी प्रक्रिया केंद्र कार्यरत आहेत की नुसती शोभेची वस्तू ठरते आहे, हेही ज्ञात नाही.

एका माहितीनुसार जगातील १५६ दशलक्ष लोकांना उपजिविकेसाठी तलाव किंवा झऱ्यांतून पाणी मिळते. २ अब्ज लोकसंख्येपैकी सुमारे तीन चतुर्थांश लोकांकडे नळाच्या पाण्याचा स्त्रोत किंवा संरक्षित विहिरी आहेत. तरी जगामध्ये अस्वच्छ पाण्यामुळे कॉलरा किंवा अमांश सारखे अतिसाराचे आजार होऊन असुरक्षित पाण्यामुळे दरवर्षी आठ लाखाहून अधिक मृत्यू होतात. ही आकडेवारी नक्कीच डोळे पांढरे करणारी आहे. त्यामुळे पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी ज्याप्रमाणे रेन वॉटर हार्वेस्टिंग सारखे उपक्रम घरोघरी राबविण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे घरातील सांडपाणी, मल वाहून नेणारी सशक्त यंत्रणा उभारून त्यामाध्यमातून या पाण्यातून दूषित घटक वेगळे करणारी यंत्रणा ग्राम स्तरावर उभारणे गरजेचे आहे. पाणी वाचवणे ही काळाची गरज आहे. मात्र, पाणी स्वच्छ ठेवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. एकीकडे येणारा काळ हा पाण्यासाठी युद्ध करणारा असेल असे समजून चीन सारखा देश पाण्याचे नियोजन आणि स्वच्छता याकडे आपले लक्ष केंद्रित आहे आणि दुसरीकडे आपण जर नदी माता म्हणून म्हणून तिच्याच उदरात नको ती घाण टाकत असू तर उद्या पिण्याला तर दूर वापरण्यास सुद्धा योग्य पाणी मिळणार नाही.

साधं उदाहरण देतो म्हटले तर, आजपासून वीस वर्षाचा काळ बघितला तर कुणी पाणी विकत घेऊन वापरतील अशी कल्पना सुद्धा हास्यास्पद ठरवल्या गेली असती. मात्र, आज तीच परिस्थिती सर्वत्र आहे, हे समजून घ्यावे लागेल. एका आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील ३९१ स्थानिक स्वराज्य संस्थांकडून एकूण ९७५८.५३ एमएलडी इतक्या सांडपाण्याची निर्मिती होते. मात्र, त्यातील ७७४७.२४ एमएलडी इतक्याच पाण्यावर प्रक्रिया केली जाते. विशेष म्हणजे देशातील सांडपाण्यापैकी १३ टक्के वाटा हा महाराष्ट्राचा आहे.

घरोघरी उभारलेले शौचालयाचे शोषखड्डे आणि त्यातून झिरपणारे पाणी आता विहिरीच्या पाण्यात मिसळून विहिरी दूषित होत आहेत. आता कुठे कुठे पाणी वाहून नेणारे पाईप कुठल्या नाल्यातून किंवा घाणयुक्त पाण्यातून टाकल्या जातात. नंतर ते पाईप फुटले की योग्य आहे, याची शहानिशा सुद्धा केली जात नाही. अशाच नाल्यातून गेलेली पाणी पुरवठ्याची पाईप लाईन फुटल्याने यवतमाळ येथील गिरीनगर परिसरातील लोकांच्या घरी नळातून आलेल्या पाण्याची तपासणी केली असता, त्यातून विष्ठेचे विषाणू आढळून आल्याचा प्रकार नगरसेवक पिंटू बांगर यांच्या प्रयत्नाने समोर आला होता. या दूषित पाण्याने स्थानिकांना जुलाब, मळमळ, उलट्यांचा त्रास झाल्याने ही पाईप लाईन आता बदलावी अशी मागणी बांगर यांनी रेटून धरली होती.

मागच्या वर्षी मे महिन्यात लंडन येथील थेम्स वॉटर या पाणी व सांडपाणी सेवा पुरविणाऱ्या सर्वात मोठ्या कंपनीला नदी आणि झऱ्यांत प्रदूषित पाणी सोडल्याबद्दल आणि गुंतवणूकदारांना बेकायदा लाभांश दिल्याबद्दल तब्बल १२ कोटी ३० लाख पौंडाचा दंड अशा कंपन्यांच्या कामकाजावर लक्ष ठेवणाऱ्या ऑफवॅट ने ठोठावला होता. आपल्याकडे प्रदूषण नियंत्रण मंडळ मात्र शोभेची वस्तू ठरते आहे, असे खेदाने म्हणावे लागते.

नद्या शुद्ध निर्मळ पाण्याचे स्त्रोत असल्याने त्यांना जीवनदायिनी म्हटल्या जाते. आदिमानव काळापासून नद्यांच्या किनारीच मानवाने वस्त्या निर्माण करून विकासाकडे पाऊल ठेवले होते. मात्र, हेच पाऊल आता नद्यांना पाताळात घालू पाहत आहे, अशी स्थिती निर्माण झाली आहे. मृतपाय होऊ पाहणाऱ्या या नद्यांना नवसंजीवनी देण्यासाठी आधी आपण नद्या प्रदूषित करणे सोडून द्यायला हवे. निसर्ग आपोआप स्वतःच त्या शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न करेल, हे नक्की.

**लीलाधर दवंडे**
कामठी (नागपूर)
८४१२८७७२२०

# नवीन अध्यक्ष

नितीन यांनी भाजपच्या विजयाचा केवळ दावाच केला नाही, तर निकालाचा अचूक अंदाज वर्तवला होता. त्यानंतर देशात झालेल्या निवडणुकीवेळीही त्यांचा अंदाज अचूक ठरला, तेव्हाच या तरुणाकडे विशेष राजकीय कौशल्य आणि राजकीय समज असल्याची खात्री वरिष्ठ नेत्यांना पटली.

नवीन अध्यक्ष विचारविनिमय करून वरिष्ठ नेत्यांनी नाव ठरवलं असलं, तरी पक्षाच्या घटनेनुसार संपूर्ण लोकशाही प्रक्रिया पूर्ण करूनच भारतीय जनता पक्षाचे बारावे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नवीन यांची बिनविरोध निवड झाली. १४ डिसेंबर २०२५ रोजी त्यांची पक्षाच्या कार्यकारी अध्यक्षपदी निवड झाली, तेव्हांच पक्षाच्या अध्यक्षपदीही तेच येतील, असा अंदाज होता. अंदाजच; कारण राजकारणात प्रत्येक गोष्टीत हजार शक्यता असतात. इथे ग्रामपंचायतीचा सदस्य होण्यासाठी प्रत्येक पक्षात इच्छुकांची झुंबड, बंडखोरी असे सारे प्रकार तुंबळ होताना जगातल्या सर्वात मोठ्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवड बिनबोभाट बिनविरोध होते, ही साधी गोष्ट नाही. पक्षातल्या या सर्वोच्च पदासाठी काही कमी इच्छुक नसतील. अनेकांनी त्यासाठी लॉबिंगही केलं असेल. पण, त्याची कुठेही चर्चा झाली नाही. वरिष्ठ नेत्यांनी विचारविनिमय करून सहमतीने एखादं नाव ठरवलं, की त्यानंतर नाराजी, असमाधानाची कुठे एक ओळही नाही. आजच्या काळात हे किती अवघड आहे, याची कल्पना आपणां सगळ्यांनाच आहे. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचा पक्षात किती धाक आहे, पक्ष संघटनेवर त्यांची किती मजबूत पकड आहे, हेच या सगळ्या निवड प्रक्रियेतून स्पष्ट होतं. अन्य पक्षांनी यावरून बरंच काही शिकण्यासारखं आहे. नवीन यांच्या निवडीवेळी, मंगळवारी सर्व वरिष्ठ नेत्यांनी आणि संपूर्ण कार्यकारिणीने हजर राहण्यालाही प्रतिकात्मक का होईना, पण मोठा अर्थ आहे. नवीन यांचं नांव जाहीर झाल्यानंतर त्यांच्या गौरवार्थ बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मी पक्षाचा एक कार्यकर्ता आहे आणि नितीन नवीन हे माझे बॉस आहेत!' हे केलेलं वक्तव्य त्या पक्षात पक्ष संघटनेला असलेलं महत्त्व अधोरेखित करतं. यामुळे तरुणांना पक्ष संघटनेत काम करण्यास उत्साह मिळतो आणि जे पदाधिकारी आहेत, त्यांनाही समाधान मिळतं. पक्ष संघटनेचं बळ अशा एका वाक्यानेही वाढत असतं. हेच भाजपचं इतर पक्षांपेक्षा वेगळेपण आहे.

नितीन नवीन यांचा एकमेव उमेदवारी अर्ज असणार, हे सगळ्यांसाठी स्पष्ट असलं तरी त्यांच्या समर्थनार्थ एकूण ३७ वेगवेगळ्या गटांकडून समर्थनपत्रं दिली गेली होती. त्यातल्या एका समर्थनपत्रावर तर खुद्द पंतप्रधान मोदी आणि संसदीय पक्षाच्या सदस्यांच्या सह्या होत्या. नितीन हे भाजपचे सर्वात तरुण अध्यक्ष असले, तरी राजकारणात नवखे नाहीत. त्यांचे



वडील, किशोरप्रसाद सिन्हा हे भाजपचे बिहारमधल्या बांकीपूर मतदारसंघात आमदार होते. त्याच्या निधनानंतर २००६ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत वयाच्या अवघ्या सव्विसाव्या वर्षी नितीन पहिल्यांदा त्याच मतदारसंघातून आमदार झाले. त्यानंतर सलग पाच निवडणुका त्यांनी जिंकल्या.

# युवा शक्ती, शिक्षण व्यवस्था आणि समस्यांचे ओझे

शिक्षण ही या जगातील सर्व मानवांसाठी उपलब्ध असलेली एक अमूल्य संधी आहे, जी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक उच्च पदासाठी, प्रत्येक क्षमतेसाठी आणि प्रत्येक विकासासाठी प्रवेश प्रदान करते. शिक्षणच एखाद्या व्यक्तीला इच्छित असलेले प्रत्येक ध्येय साध्य करण्यास सक्षम करते. यासोबतच, शिक्षणावर मानवाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी देखील आहे. शिक्षणामुळे माणसाला चांगले जीवन जगण्याची आणि जीवनात येणाऱ्या समस्या सोडवण्याची ताकद मिळते. शिक्षण केवळ मानवी मूल्यांना परिष्कृत करत नाही तर आपल्या कलात्मक कौशल्यांना देखील वाढवते. आजच्या स्पर्धात्मक युगात ते आपल्याला अधिक कार्यक्षम बनण्यास मदत करते. ते आपल्याला प्रगतीसाठी प्रेरणा देते आणि सतत प्रगतीच्या मार्गावर जाण्यास मार्गदर्शन करते. माणूस आपल्या जीवनासाठी अशाच शिक्षणाची कल्पना करतो जे त्याचे जीवन यशस्वी आणि अर्थपूर्ण बनवते. प्रत्येक मानवाला शिक्षणाचा समान अधिकार आहे आणि जगातील प्रत्येकाला शिक्षणाचा हा अधिकार मिळाला पाहिजे जेणेकरून ते त्यांचे जीवन सुधारू शकतील, हाच शिक्षणाचा देखील उद्देश आहे. जगातील ज्या देशांना शिक्षणाची गुणवत्ता आणि महत्त्व समजले आहे, ते देश आज समृद्ध राष्ट्रांमध्ये गणले जातात, लहान देशही शिक्षणाच्या गुणवत्तेच्या बळावर विकसित होऊन उन्नत झाले आहेत. युनेस्कोने २०२६ च्या आंतरराष्ट्रीय शिक्षण दिनाची अधिकृत थीम "शिक्षण निर्माण करण्यासाठी तरुणांची शक्ती" अशी घोषित केली आहे.

तरुणांना त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यास मदत करण्यासाठी देशात नवीन शिक्षण प्रणाली आणि कौशल्य विकासावर भर दिला जात आहे. फ्यूचर ऑफ जॉब्स रिपोर्ट २०२५ नुसार, २०३० पर्यंत सध्याच्या कामगारांपैकी सुमारे ३९ टक्के लोकांची कौशल्ये कालबाह्य होण्याची शक्यता आहे. इंडिया स्किल्स रिपोर्ट २०२५ नुसार, फक्त ५४.८ टक्के भारतीय तरुणांना रोजगारयोग्य मानले जाते, आणि अनेकांमध्ये कामाच्या ठिकाणी यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली डिजिटल प्रवीणता, अनुकूलता आणि सॉफ्ट स्किल्सचा अभाव आहे.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या आकडेवारीनुसार, २०२२ मध्ये भारतात अटक केलेल्या सर्व अल्पवयीन मुलांपैकी जवळजवळ निम्मे (४९.५ टक्के) हिंसक गुन्ह्यांमध्ये सहभागी होते, जे २०१६ मध्ये ३२.५ टक्क्यांपेक्षा लक्षणीय वाढ आहे. २०२२ मध्ये प्रति लाख मुलांमागे ६.९ वरून २०२३ मध्ये राष्ट्रीय बालगुन्हेगारी दर किंचित वाढून ७.१ झाला. दिल्लीत मुलांमध्ये सर्वाधिक गुन्हेगारीचा दर ४१.१ प्रति लाख मुलांमागे नोंदवला गेला, जो राष्ट्रीय सरासरीपेक्षा खूपच जास्त आहे. मानसिक ताणाची समस्या झपाट्याने वाढली आहे आणि देशातील तरुणांमध्ये ती सतत वाढत आहे. वाढता ताण, चिंता आणि नैराश्य, मानसिक आधाराचा नितांत अभाव आणि सततचा सोशल स्टिग्मा यामुळे तरुणांना मानसिक आरोग्याचा समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. २०२०-२२ मध्ये, भारतात १५-२९ वयोगटातील लोकांमध्ये आत्महत्येमुळे ६०,७०० हून अधिक मृत्यू झाले, जे जगात सर्वाधिक आहे. सुशिक्षित तरुणांमध्ये बेरोजगारी वाढत आहे, कारण शिक्षण आणि कौशल्ये नोकरी बाजाराच्या गरजांनुसार जुळत नाहीत, तर अनेकांना मजबुरीमुळे कमी पगाराच्या, किरकोळ किंवा धोकादायक नोकऱ्यांमध्ये काम करावे लागते. जेव्हा सरकारी कार्यालयात चपराशी पद भरतीची जाहिरात येते, तेव्हा हजारो उच्च शिक्षित तरुण त्या पदासाठी अर्ज करतात. मित्रांचा दबावामुळे, ताणतणावामुळे किंवा केवळ मनोरंजनासाठी, तरुण व्यसनाच्या जाळ्यात अडकण्याची शक्यता लक्षणीयरीत्या वाढत आहे आणि व्यसनाधीनतेवर मात करण्यासाठी पुरेसे उपचार, पुनर्वसन आणि उपचार केंद्रांचा अभाव ही समस्या आणखी वाढवत आहे.

कॅगच्या २०२५ च्या अहवालानुसार, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेत मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आली आहे. ज्याअंतर्गत ५६.१४ लाख तरुणांना प्रशिक्षण देण्यात आले होते, त्यापैकी फक्त २३.१८ लाख तरुणांना रोजगार मिळाला, तर ३२.९६ लाख तरुण म्हणजेच ५८.७१ टक्के तरुण कौशल्य विकास योजनेचा लाभ घेत असूनही बेरोजगार राहिले. यामध्ये, १३.३३ टक्के तरुण उमेदवारांना कौशल्यासाठी आवश्यक असलेली किमान पात्रता देखील पूर्ण करता आली नाही. ९४.५३ टक्के प्रकरणांमध्ये बँक खात्यांचे तपशील रिकामे होते, ९४ टक्क्यांहून अधिक बँक खात्यांमध्ये वैध माहिती नव्हती, यामुळे, ३४ लाख तरुणांना ५०० रुपयांचे रिवार्ड देखील मिळाले नाही. या योजनेअंतर्गत, एकाच ठिकाणी घेतलेल्या प्रशिक्षणाचे फोटो अनेक राज्यांमध्ये वापरले जात होते. अनेक प्रशिक्षण केंद्रे प्रत्यक्षात बंद होती, पण ती कागदावर कार्यरत होती. बहुतेक तरुण उमेदवारांचे ईमेल आयडी आणि मोबाईल नंबर देखील बनावट होते. २०१५ ते २०२४ दरम्यान या योजनेअंतर्गत एकूण ₹,२६१ कोटी खर्च करण्यात आले आहेत. १३.२ दशलक्ष तरुणांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट होते आणि १.१ कोटी तरुणांना कागदावर प्रशिक्षण प्रमाणपत्रे मिळाली, परंतु कॅगने याला आकड्यांचा फेरफार म्हटले.

देशातील वाढती आर्थिक असमानता समाजात मोठी दरी निर्माण करत आहे, विकासकामांना अडथळा आणत आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक सर्वेक्षण अहवाल, युथ पल्स २०२६: नेक्स्ट जनरेशन व्हिजन फॉर अ चेंजिंग वर्ल्डच्या निष्कर्षांनुसार, ४८.२ टक्के प्रतिसादकर्त्यांनी वाढती आर्थिक असमानता हे सर्वात मोठे संकट म्हणून ओळखले. या सर्वेक्षणात १४४ देशांनी भाग घेतला. ५७ टक्के तरुणांनी आर्थिक चिंता हे तणावाचे मुख्य कारण असल्याचे सांगितले. ५७.२ टक्के तरुणांनी रोजगार निर्मिती किंवा उपलब्धतेला गरज म्हणून प्राधान्य दिले, तर ४६.१ टक्के तरुणांनी परवडणाऱ्या आणि दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता ही एक गरज मानली.

देशातील बेरोजगारीची व्याप्ती आपल्या सर्वांना माहिती आहे. परंतु दशकांपासून रिक्त पदे न भरल्याने व्यवस्था आणि कार्यपद्धती कमकुवत होते. उदाहरणार्थ, आपल्या महाराष्ट्रातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात २५८ प्राध्यापक पदांची मंजूर संख्या आहे. सध्या फक्त ८६ पदांवर प्राध्यापक कार्यरत आहेत. उर्वरित ६६ टक्के पदे रिक्त आहेत, ज्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर थेट परिणाम होत आहे. ही परिस्थिती केवळ एका विद्यापीठापुरती मर्यादित नाही, तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यात आणि इतर काही राज्यांमध्येही अशीच परिस्थिती आहे. अनेक राज्यांमधील शिक्षण विभागाची स्थिती खूपच भयानक आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये, शिक्षण विभागातील घोटाळे वारंवार समोर येतात. भ्रष्टाचार, परीक्षेचे पेपर फुटणे, बनावट कागदपत्रे, बनावट भरती, परीक्षेसाठी बनावट उमेदवार आणि बनावट पदव्या खरेदी हे सर्व उघड होत आहेत. सध्या महाराष्ट्रात शालार्थ आयडी घोटाळा चर्चेत आहे. हे सर्व शिक्षणाच्या पवित्र व्यवसायाला कलंकित करते आणि देशाच्या सध्याच्या आणि भावी पिढ्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतात.

देशातील अनेक राज्यांमधील खाजगी शैक्षणिक संस्था आणि सरकारी शाळांमध्ये मोठी तफावत आहे आणि कालांतराने ही तफावत झपाट्याने वाढत आहे. गेल्या दशकात (सुमारे २०१४-२०२४), भारतात अंदाजे ९०,००० सरकारी शाळा बंद झाल्या आहेत आणि या काळात, सरकारी आकडेवारी आणि युनेस्कोच्या अहवालाच्या मते, भारतात खाजगी शाळांची संख्या अंदाजे ४२,९४४ ने लक्षणीयरीत्या वाढली आहे, दर्जेदार शिक्षण, चांगल्या आरोग्य सुविधा आणि पात्रतेनुसार नोकरी किंवा व्यवसायाची उपलब्धता, या तीन गोष्टी मानवांना सहज उपलब्ध असाव्यात. भेदभाव किंवा आर्थिक असमानता कधीही यासाठी अडथळा ठरू नये. प्रत्यक्षात, देशाचे संपूर्ण भविष्य तिथल्या शिक्षण धोरणावर आणि त्याच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. चांगले शिक्षण समाज आणि देशाच्या प्रत्येक क्षेत्रात सक्षम आणि जबाबदार कार्यशैलीसह प्रभावी युवा शक्ती निर्माण करते. शिक्षणाद्वारे, लोक मूल्ये, ज्ञान, कौशल्ये प्राप्त करतात, बुद्धिमान नागरिक बनतात आणि अशा प्रकारे देश आणि जगाला विकासाचा मार्ग दाखवतात. आपल्यासमोर विकसित देशांचे उदाहरण आहे, ऑलिंपिकसारख्या जागतिक स्तरावरील खेळांमध्ये, लहान देश पदकतालिकेत अव्वल स्थानावर असतात. ज्या देशांनी प्रगती केली आहे त्यांनी त्यांच्या मजबूत आणि कार्यक्षम शिक्षण प्रणालीच्या बळावर हे साध्य केले आहे. भविष्य फक्त त्या देशांचेच उज्ज्वल असेल, ज्यांना शिक्षणाची गुणवत्ता समजते.

**डॉ. प्रीतम भी. गेडाम**
मोबाईल/व्हॉट्सॲप क्रमांक
०८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

## महत्त्वाचे...



### ऊसतोड मजुराचे हातपाय बांधून दगडाने मारहाण..

बीड: बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील एका ऊसतोड मजुराची सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यात निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे संतापाची लाट उसळली आहे. बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील उखळवाडी येथील रहिवासी असलेले मच्छिंद्र अंबादास भोसले (वय 42) हे गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी सातारा जिल्ह्यातील जरंडेश्वर शुगर मिलमध्ये ऊसतोडणीचे काम करत होते.स्थानिक संशयित आरोपी अजय राजेंद्र माने याने मच्छिंद्र यांना जेवायला असे सांगून विश्वासाने सोबत नेले. मात्र, जेवायला नेण्याऐवजी आरोपीने त्यांना स्वतःच्या शेतात नेऊन त्यांचे हात-पाय बांधले आणि अत्यंत क्रूरपणे दगडाने डोके ठेचून त्यांची हत्या केली. हत्येनंतर पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने त्याने मच्छिंद्र यांचा मृतदेह उसाच्या शेतात फेकून दिला. मच्छिंद्र भोसले रात्री घरी न परतल्याने त्यांच्या पत्नीने 17 जानेवारी रोजी कोरेगाव पोलीस ठाण्यात ते बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवली होती. तब्बल पाच दिवसांनंतर, मंगळवारी सकाळी आरोपीच्या वडिलांना स्वतःच्या शेतात एक कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास केला असता, तो मृतदेह मच्छिंद्र भोसले यांचाच असल्याचे निष्पन्न झाले.

### कोल्हापूरच्या सुकन्याचा अमेरिकेत डंका



कोल्हापूर : शिक्षणाचे माहेरघर असलेल्या जयसिंगपूर शहराला अमेरिकेतून अभिमानाची बातमी मिळाली आहे. शहरातील चौथ्या गल्लीतील अर्जुनवाडकर कुटुंबातील सुकन्या उर्मिला अशोक पुरंदरे-अर्जुनवाडकर (उमा) यांची न्यूजर्सी प्रांतातील होपवेल टाउनशिपच्या उपमहापौरपदी पुन्हा निवड झाली. या निवडीमुळे जागतिक स्तरावर जयसिंगपूरचे नाव उजळले असून, मराठी महिलेच्या कर्तृत्वाने मराठी मातीचा मान वाढला आहे.उर्मिला यांचे बालपण आणि प्राथमिक शिक्षण जयसिंगपूरमध्ये झाले. जनार्दन अर्जुनवाडकर यांच्या कुटुंबातील या कन्येने स्थानिक शाळांमधून प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातून एम. एससी. ही पदवी प्राप्त केली. नंतर त्यांनी अमेरिकेत पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून न्यूजर्सी येथील प्रतिष्ठित औषध कंपनीत गेली 25 वर्षांहून अधिक काळ शास्त्रज्ञ म्हणून कार्य केले आहे. त्यांचे पती डॉ. अशोक विनायक पुरंदरे हेही शास्त्रज्ञ आहेत. होपवेल टाउनशिपमध्ये उर्मिला यांनी 2021 पासून नगरसेविका (टाउनशिप कमिटी मेंबर) म्हणून प्रवेश केला. 2024 च्या निवडणुकीत डेमोक्रॅटिक उमेदवार म्हणून त्यांनी 6,023 मते मिळवून (61.83 टक्के) प्रतिस्पर्धी बाब झॅन्सिटिस यांच्यावर (251 मते) मोठा विजय मिळवला. या यशानंतरच त्यांना 2024 मध्ये उपमहापौरपदाची धुरा सोपविण्यात आली होती.

# राहुल म्हणाले- लोभाची महामारी संपूर्ण भारतात पसरलीय:जनतेने सत्तेकडून उत्तर मागितले पाहिजे



दिव्य वतन /वृत्तसेवा

नवी दिल्ली : राहुल गांधी यांनी बुधवारी सांगितले की, देशभरात लोभाची महामारी पसरली आहे. याचे सर्वात भयानक रूप शहरी दुरवस्थेच्या स्वरूपात समोर येत आहे. लोकांनी सरकारकडून उत्तराची मागणी केली पाहिजे. त्यांनी आरोप केला की, सत्ता आणि मोठ्या कॉर्पोरेट घराण्यांमधील संगनमतामुळे लोकशाहीची मूळ भावना कमकुवत होत आहे. लोकशाही तेव्हाच मजबूत होईल जेव्हा प्रश्न विचारले जातील. राहुल यांनी ही टिप्पणी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वरील एका पोस्टमध्ये केली.

राहुलने मीडिया रिपोर्टचा व्हिडिओही शेअर केला, जो कथितरित्या दिल्लीतील मुबारकपूर डाबस येथील शर्मा एन्क्लेव्हचा आहे. व्हिडिओमध्ये गटार ओव्हरफ्लो झाल्यामुळे परिसरात पसरलेले घाणेरडे पाणी दाखवले आहे. ते म्हणाले, 'आज प्रत्येक सामान्य भारतीयाचे जीवन असेच नरकयातना बनले आहे. व्यवस्था सत्तेत बसलेल्या लोकांच्या हातात विकली गेली आहे. सर्वजण एकमेकांची पाठ थोपटतात आणि मग एकत्र येऊन जनतेला चिरडतात.'

ते म्हणाले, 'देशभरात लोभाची महामारी पसरली आहे. शहरी कुजकेपणा हे त्याचे सर्वात भयानक रूप आहे. आपला समाज मरत आहे कारण आपण या कुजकेपणाला 'न्यू नॉर्मल' मानले आहे. सुन्न, शांत आणि उदासीन होऊन. उत्तराची मागणी करा, नाहीतर हा कुजकेपणा प्रत्येक दारापर्यंत पोहोचेल.'

राहुलने आपल्या पोस्टमध्ये #TINA (There Is No Accountability) हा हॅशटॅग वापरला. यापूर्वी काही दिवसांपूर्वी, नोएडा येथे एका सॉफ्टवेअर इंजिनिअरच्या मृत्यूनंतरही राहुलने जबाबदारीच्या अभावाचा मुद्दा उपस्थित केला होता. ते म्हणाले होते की, ही घटना भारतात पसरत असलेल्या लोभाच्या संस्कृतीचा आणि इतर जीवांबद्दलच्या असंवेदनशीलतेचा थेट परिणाम आहे.

मृताची ओळख 27 वर्षीय युवराज मेहता अशी झाली होती, जो गुरुग्राममध्ये काम करत होता. 16 जानेवारीच्या रात्री तो घरी परतत असताना, त्याची कार एका बांधकाम सुरू असलेल्या जागेजवळच्या पाण्याने भरलेल्या खड्ड्यात पडली. त्याने सुमारे दोन तास मदतीसाठी याचना केली, परंतु वेळेवर मदत न मिळाल्याने त्याचा मृत्यू झाला, असे सांगण्यात आले.

# ठाकरे गटाच्या गटनेतेपदी किशोरी पेडणेकर

## मुंबई महापालिकेत पक्षाचे करणार नेतृत्व

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई - शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मुंबई महापालिकेतील पक्षाच्या गटनेतेपदी किशोरी पेडणेकर यांची नियुक्ती केली आहे. किशोरी पेडणेकरांनी यापूर्वी मुंबईच्या महापौर म्हणून काम केले आहे. त्यानंतर आता पक्षाने पुन्हा एकदा त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे.

मुंबई महापालिकेची गत 15 तारखेला निवडणूक झाली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी झालेल्या मतमोजणीत भाजपला सर्वाधिक 89 जागा मिळाल्या, तर ठाकरे बंधूंच्या युतीला अवघ्या 71 जागांवर समाधान मानावे लागले. परिणामी, ठाकरेंची मुंबई महापालिकेवरील तब्बल 25 वर्षांची सत्ता संपुष्टात आली. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने आज मुंबई महापालिकेतील पक्षाच्या गटनेतेपदी किशोरी पेडणेकर यांची निवड केली. किशोरी पेडणेकर मुंबई महापालिकेच्या वॉर्ड क्रमांक 199 मधून विजयी झाल्या होत्या. त्यांनी शिंदे गटाच्या आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवार रुपल कुसळे यांचा पराभव केला.ठाकरे गटाच्या गटनेतेपदासाठी किशोरी पेडणेकर यांच्यासह विशाखा राऊत, मिलिंद वैद्य व श्रद्धा जाधव यांची नावे चर्चेत होती. पण आज नवनिर्वाचित नगरसेवकांच्या झालेल्या बैठकीत पेडणेकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला. किशोरी पेडणेकर या ठाकरे गटाच्या निष्ठावंत कार्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात. शिवसेनेत फूट पडल्यानंतर पक्षाच्या अनेक नगरसेवकांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली. पण पेडणेकरांनी खंबीरपणे ठाकरेंची साथ दिली. पक्षाच्या पडझडीच्या काळात त्यांनी प्रसारमाध्यमांवर पक्षाची यशस्वीपणे बाजू मांडली. या



सर्व गोष्टींचा विचार करून पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या खांद्यावर गटनेतेपदाची जबाबदारी टाकल्याची माहिती आहे.

महापौर पदाच्या निवणडणुकीसाठी मुंबई महापालिकेच्या मुख्यालयात सर्वच पक्षांच्या नवनिर्वाचित नगरसेवकांची बैठक बोलावण्यात येईल. त्यात महापौर निवडणुकीची प्रक्रिया पार पडले. त्यानतंर नवनिर्वाचित महापौर राजकीय पक्षांचे गटनेत्यांच्या नावांची घोषणा करतात अशी पद्धत आहे. त्यासाठी राजकीय पक्ष एका सिलबंद लिफाफ्यामध्ये आपल्या पक्षाच्या गटनेत्याचे नाव लिहून देतात [illegible]र ते नाव वाचून दाख[illegible] पण यंदा बहुतांश पक्षांनी यापूर्वीच आपल्या गटनेतेपदाची नावे जाहीर केली आहेत.

दुसरीकडे, मुंबई महापालिकेत 6 नगरसेवक निवडून आलेल्या मनसेने आपल्या पक्षाच्या गटनेतेपदी यशवंत किल्लेदार यांची निवड केली आहे. तर काँग्रेसने या पदासाठी कुर्ल्याचे नगरसेवक अश्रफ आझमी यांचे नाव निश्चित केले आहे. काँग्रेसने मंगळवारी कोकण भवनात जाऊन आपल्या पक्षाच्या गटाची नोंदणी केली. दुसरीकडे, मुंबईसह राज्यातील सर्वच 29 महापालिकांतील महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत उद्या 22 जानेवारी रोजी काढली जाणार आहे. त्यासाठी राज्याच्या नगरविकास विभागाने जय्यत तयारी केली आहे.

# शिंदे गट म्हणजे MIM, बेईमान, महाराष्ट्रद्रोही त्यांच्याशी युती करणारेही या विशेषणांना पात्र

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई - शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेशी युती करण्याच्या मुद्यावरून राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील मनसेला खडेबोल सुनावले आहेत. शिंदे गट म्हणजे मराठी माणसांतील एमआयएम, बेईमान व महाराष्ट्रद्रोही आहे. त्यामुळे त्यांच्यासोबत जाणारेही याच विशेषणांना पात्र ठरतात, असे ते म्हणालेत. या प्रकरणी त्यांनी कल्याण डोंबिवलीत शिंदे गटाशी युती करणाऱ्या मनसेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांवर निलंबनाची कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

मनसेचे माजी आमदार राजू पाटील यांनी बुधवारी कल्याण डोंबिवली महापालिकेत शिंदे गटाला पाठिंबा देण्याची घोषणा केली. मनसेने महापालिका निवडणुकीत ठाकरे गटाशी युती करत शिंदे गटाविरोधात आरोपांची राळ उठवली होती.



त्यानंतर लगेचच मनसेने शिंदे गटाला पाठिंबा दिल्यामुळे ठाकरे बंधूंच्या युतीत एकच खळबळ माजली आहे. या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी मनसेवर टीकेची झोड उठवली आहे. ते म्हणाले, आमची भूमिका फार वेगळी व कडवट आहे. ज्यांनी महाराष्ट्राशी, बाळासाहेब ठाकरेंशी, मराठी माणसांशी गद्दारी व बेईमानी केली, त्यांच्याशी कोणत्याही प्रकारची राजकीय व अन्य संबंध ठेवायचे नाहीत.

महाराष्ट्राच्या गद्दारांना मदत होईल अशी भूमिका घ्यायची नाही. सत्ता येते व सत्ता जाते. आम्ही सत्तेसाठी हपापलेले लोक नाही. स्वतः राज ठाकरेही नाहीत. त्यामुळे आमच्या भूमिका स्पष्ट आहेत. कल्याण डोंबिवलीचा विषय हा समोर आला आहे. तो अत्यंत चिंताजनक आहे. त्यांच्या मते, हा स्थानिक पातळीवरील निर्णय आहे. असू शकेल. पक्षाच्या मूळ ध्येयधोरणांशी प्रतारणा करून कोणत्याही पक्षाचे स्थानिक म्हणवून घेणारे नेतृत्व विपरित भूमिका घेत असेल तर पक्ष नेतृत्वाने त्याच्याविरोधात कारवाई केली पाहिजे. पक्षनेतृत्वाने त्यांच्यावर पक्षातून निलंबित करण्याची कायदेशीर कारवाई केली पाहिजे, असे ते म्हणाले.संजय राऊत म्हणाले, काँग्रेसच्या 12 नगरसेवकांनी अंबरनाथमध्ये भाजपशी असंग केला. त्यानंतर काँग्रेसने तत्काळ त्यांच्यावर पक्षाच्या ध्येयधोरणांशी प्रतारणा केल्याचा ठपका ठेवत त्यांच्यावर कारवाई केली. त्यांना पक्षातून काढून टाकले. ही एक राजकीय व्यवस्था आहे. फक्त स्थानिक पातळीवर निर्णय झाला म्हणून हा विषय संपत नाही.

# केडीएमसीत कुरघोडीचे राजकारण होऊ द्यायचे नव्हते:सत्तेला चिकटलो तर काहीतरी मिळेल

दिव्य वतन /वृत्तसेवा

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा जाहीर करत, राजकारणात खळबळ उडवून दिली. आता मनसेने शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा का दिला? याचे कारण मनसे नेते राजू पाटील यांनी सांगितले. "कल्याण-डोंबिवलीतील पळवापळवीचे घाणेरडे राजकारण थांबवण्यासाठी आणि शहराच्या विकासासाठी आम्ही सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे," असे राजू पाटील म्हणाले.कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत



एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे ५३, भाजपचे ५०, ठाकरे गटाचे ११, तर मनसेचे ५ नगरसेवक निवडून आले होते. सत्तास्थापनेसाठी शिंदेंच्या शिवसेनेला ९, तर भाजपला १२ नगरसेवकांची आवश्यकता आहे. त्यातच कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत मोठा ट्विस्ट पाहायला मिळाला. महायुतीमधील शिंदेंच्या शिवसेनेने मनसेच्या पाच नगरसेवकांचा पाठिंबा घेतला. खासदार श्रीकांत शिंदे यांनी मनसे आणि शिवसेना (शिंदे) एकत्र सत्तेत असणार असे जाहीर केले. आता मनसे नेते राजू पाटील यांनी शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा देण्यामागची इनसाइड स्टोरी सांगितली. कोकण विभागीय आयुक्तांकडे नगरसेवकांची गट नोंदणी केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना राजू पाटील म्हणाले की, "भाजपचे ५० आणि शिंदे गटाचे ५३ नगरसेवक निवडून आले आहेत. गेल्या काही दिवसांपासून नगरसेवकांची पळवापळवी सुरू होती, ज्यामुळे शहरात अस्थिरता निर्माण झाली होती.

# संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात राहणाऱ्या आदिवासींना नोटीस

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई - बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी रहिवाशांनी वन विभागाच्या नोटिशींविरोधात उद्यानाच्या मुख्य प्रवेशद्वारावर नुकतेच तीव्र आंदोलन छेडले. प्रशासनाकडून घरे रिकामी करण्याबाबत दबाव टाकला जात असल्याचा आणि बस सेवा अचानक बंद केल्याचा गंभीर आरोप या आंदोलकांनी केला आहे. मात्र, उद्यान प्रशासनाने हे सर्व आरोप फेटाळून लावत कोणालाही वैयक्तिकरीत्या थेट नोटीस बजावली नसल्याचे स्पष्ट केले आहे. केवळ उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार परिसरात सार्वजनिक सूचना फलक लावण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.येऊर एन्व्हायर्नमेंटल सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष रोहित मनोहर जोशी यांनी 31 डिसेंबर 2025 रोजीचा वादग्रस्त




शासन निर्णय रद्द करण्यासाठी महसूल मंत्र्यांकडे हस्तक्षेप अर्ज दाखल केला आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अधिसूचित क्षेत्रातील तब्बल 1053 एकर वनजमिनीवर खासगी व्यक्तींचे मालकी हक्क प्रविष्ट करण्यास या आदेशाद्वारे मान्यता देण्यात आली आहे. या संवेदनशील प्रकरणाची सुनावणी उद्या, 22 जानेवारी रोजी कोकण विभागीय आयुक्तांसमोर होणार असून, राष्ट्रीय उद्यानाच्या जमिनीवर खासगी हक्क देण्याच्या या प्रयत्नामुळे पर्यावरण वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

रोहित जोशी यांच्या मते, राष्ट्रीय उद्यानातील जमिनीवर खासगी व्यक्ती किंवा संस्थांचे मालकी हक्क मान्य करणे हे केवळ बेकायदेशीर नसून, मुंबई-ठाण्यातील शहरी जंगलांच्या अस्तित्वासाठी अत्यंत धोकादायक ठरणार आहे. मंत्र्यांनी आपल्या घटनात्मक कर्तव्याचे पालन करून या वादग्रस्त आदेशाचा तातडीने पुनर्विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. या लढ्याला बळ देण्यासाठी मुंबई आणि ठाण्यातील सर्व पर्यावरणप्रेमींनी एकत्रित येऊन पाठिंबा दर्शवावा, असे आवाहनही जोशी यांनी या निमित्ताने केले आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सीमेतील सर्वे क्रमांक 291 आणि 297 ही जमीन, जी अधिकृत महसूल नोंदीनुसार 'आरक्षित वन' म्हणून वर्गीकृत असून वन विभागाच्या सातत्याने नियंत्रणात आहे, ती खासगी प्रतिवादींना हस्तांतरित करण्याचा वादग्रस्त आदेश महसूल मंत्र्यांनी 31 डिसेंबर रोजी दिला होता. मात्र, या निर्णयावर चहुबाजूंनी तीव्र टीका झाल्यानंतर या आदेशाला स्थगिती देण्यात आली असून, जिल्हाधिकारी कार्यालय व वनविभागाला याप्रकरणी पुनर्विचार याचिका दाखल करण्याची मुभा देण्यात आली आहे.

# ट्रम्प म्हणाले- ग्रीनलँड हवे, पण बळाचा वापर करणार नाही:युरोप आम्हाला एक बर्फाचा तुकडा देत नाहीये; डेन्मार्क कृतघ्न, सोमालियाला मंदबुद्धी म्हटले

दिव्य वतन /वृत्तसेवा

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ग्रीनलंड ताब्यात घेण्याच्या योजनेचे जगासमोर समर्थन केले आहे. बुधवारी वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम (WEF) मध्ये त्यांनी सांगितले की, ग्रीनलंडची सुरक्षा अमेरिका वगळता इतर कोणताही देश करू शकत नाही.

मात्र, ट्रम्प यांनी पहिल्यांदाच सांगितले की, ग्रीनलंड मिळवण्यासाठी अमेरिका बळाचा वापर करणार नाही. यावर ताबा मिळवण्यास विरोध केल्याबद्दल त्यांनी डेन्मार्कला कृतघ्न म्हटले.

त्यांनी तक्रारीच्या सुरात सांगितले की, त्यांना फक्त एक बर्फाचा तुकडा हवा आहे, जो युरोप द्यायला तयार नाही. अमेरिका हे नेहमी लक्षात ठेवेल. ट्रम्प म्हणाले की, युरोप चुकीच्या दिशेने जात आहे.

ट्रम्प यांनी फ्रान्स, कॅनडासारख्या देशांवरही टीका केली. त्यांनी सोमालियाच्या लोकांसाठी आक्षेपार्ह शब्दांचा वापर केला आणि ते 'कमी बुद्धीचे' आणि 'समुद्री डाकू' असल्याचे म्हटले.

ट्रम्प यांनी ४५ ऐवजी ७५ मिनिटे भाषण दिले, ट्रम्प यांना ४५ मिनिटे बोलायचे होते, परंतु ते जवळजवळ ७५ मिनिटे बोलले.ट्रम्प यांनी पुन्हा एकदा सोमालिया आणि सोमाली लोकांची निंदा केली. त्यांनी सोमाली वंशाच्या लोकांचे वर्णन करण्यासाठी अपमानास्पद शब्द वापरले, त्यांना "मंदबुद्धी" आणि "समुद्री चाचे" असे संबोधले. अलिकडच्या आठवड्यात ट्रम्प यांनी सोमालिया आणि तिथून येणाऱ्या स्थलांतरितांबद्दल वारंवार अशाच प्रकारच्या टिप्पण्या केल्या आहेत.

भाषणात ट्रम्प म्हणाले की अमेरिका "भाडेकरूंचा देश बनणार नाही." त्यांनी मोठ्या कंपन्यांच्या घरे खरेदी करण्याच्या पद्धतीवर टीका केली.ट्रम्प म्हणाले, "मोठ्या कंपन्या लाखो घरे खरेदी करतात आणि कर सवलती मिळवतात. दरम्यान, सामान्य लोक कठोर परिश्रम करतात आणि घर खरेदी करण्यास सक्षम असतात. घरे लोकांसाठी आहेत, कंपन्यांसाठी नाहीत. अमेरिका भाडेकरूंचा देश बनणार नाही. आम्ही ते होऊ देणार नाही."

ट्रम्प म्हणाले की त्यांनी मोठ्या कंपन्यांना एकल कुटुंबाची घरे खरेदी करण्यास मनाई करणाऱ्या कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली आहे. त्यांनी म्हटले की ही सामान्य लोकांसाठी न्यायाची बाब आहे, कारण कंपन्या लोकांना स्वतःची घरे घेण्यापासून रोखत आहेत.

ट्रम्प यांनी असेही म्हटले की ते अमेरिकन काँग्रेसला या बंदीला कायमस्वरूपी कायदा बनवण्याचे आवाहन करत आहेत, जेणेकरून भविष्यात मोठ्या कंपन्या सामान्य लोकांची घरे ताब्यात घेऊ शकणार नाहीत.

ट्रम्प यांनी मॅक्रॉन यांना औषधांच्या किमती कमी करण्यावरून धमकी दिली



ट्रम्प म्हणाले की त्यांनी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांना औषधांच्या किमतींपेक्षा जास्त शुल्क आकारण्याची धमकी दिली. ट्रम्प यांच्या मते, फ्रान्समध्ये १० डॉलर्स किमतीच्या औषधाची किंमत अमेरिकेत १३० डॉलर्स आहे.

## फॅशन...


### सई ताम्हणकरचा पिंक लेहेंग्यातील लूकने चाहत्यांना केलं थक्क,चाहते म्हणाले "लाजवाब सुंदर"



मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय आणि तितकीच स्टायलिश अभिनेत्री सई ताम्हणकर हिने पुन्हा एकदा आपल्या ग्लॅमरस आणि एलिगंट लूकने चाहत्यांची मनं जिंकली आहेत. सध्या सोशल मीडियावर सईचा पिंक लेहेंग्यातील लूक जोरदार व्हायरल होत असून, तिच्या सौंदर्याचं आणि स्टाइलचं सर्वत्र कौतुक केलं जात आहे. गुलाबी रंगाचा हा लेहेंगा तिच्या त्वचेच्या टोनवर अतिशय खुलून दिसत असून, संपूर्ण लूक फ्रेश आणि रॉयल वाटतो. या लूकमध्ये सईने डीप नेक ब्लाउजची निवड केली असून, तो ग्लॅमरस असला तरी कुठेही भडक वाटत नाही. सॉफ्ट मेकअप, हलका ग्लो आणि नैसर्गिक लिपशेडमुळे तिचं सौंदर्य अधिकच उठून दिसतं. कपाळावरची छोटीशी टिकली आणि पारंपरिक ज्वेलरीमुळे लूकला सुंदर असा देशी टच मिळाला आहे. विशेष म्हणजे, सईने हेव्ही मेकअप किंवा ओव्हर स्टायलिंग न करता साधेपणातच एलिगन्स कसा साधायचा, हे दाखवून दिलं आहे. या फोटोशूटमध्ये सईने घातलेला हलक्या पण उठावदार गुलाबी रंगाचा लेहेंगा तिच्या व्यक्तिमत्त्वाला अगदी साजेसा आहे. लेहेंग्यावर केलेली नाजूक कढाई, सोनेरी बॉर्डर आणि सूक्ष्म डिझाईनमुळे हा पारंपरिक पोशाख अधिकच उठून दिसतो. लेहेंग्यासोबत तिने परिधान केलेला डीप नेक ब्लाउज हा लूकला ग्लॅमरस टच देतो, मात्र तरीही तो अभिजात आणि सुसंस्कृत वाटतो हीच सईच्या स्टाइलची खासियत. या संपूर्ण लूकमध्ये सईने जड नाही पण लक्षवेधी अशी पारंपरिक ज्वेलरी निवडली आहे. कानात मोठे झुमके, हातात स्टायलिश कड्या आणि बांगड्या हे सगळं एकत्र येऊन तिच्या लूकला रॉयल फील देतं. मेकअपबाबत बोलायचं झालं, तर सईने सॉफ्ट ग्लोइंग बेस, हलकं आयमेकअप आणि न्यूड पिंक लिपशेड वापरला आहे. कपाळावर लावलेली छोटीशी टिकली तिच्या पारंपरिक सौंदर्यात भर घालते.

एलिगंट लुक





या लूकमध्ये सई ताम्हणकरने निवडलेली ज्वेलरी हा संपूर्ण आउटफिटचा खास ठरते. कानातले मोठे, पारंपरिक डिझाइनचे झुमके गुलाबी लेहेंग्याला सुंदर कॉन्ट्रास्ट देतात आणि चेहऱ्यावरील तेज अधिक खुलवतात. हातात घातलेले स्टेटमेंट ब्रेसलेट आणि नाजूक साखळ्यांची लेअरिंग ही सध्या ट्रेंडमध्ये असलेली स्टायलिंग टिप ठरते. ज्वेलरीमध्ये सोनेरी रंगाला प्राधान्य देत, सईने ओव्हरडू न करता एलिगंट लूक साधला आहे.

हेअरस्टाइलने वाढवली शोभा

सईने या लूकसाठी केस स्लीक पद्धतीने मागे बांधले असून, त्यामुळे तिच्या चेहऱ्यावरील एक्सप्रेशन्स आणि ज्वेलरी अधिक उठून दिसतात. साधी पण क्लासी हेअरस्टाइल हा संपूर्ण लूक बॅलन्स ठेवते. सईला अगदी अचूकपणे ठाऊक असल्याचं या लूकवरून स्पष्ट होतं. तुम्ही देखील सिंपल हेअरस्टाईल ठेऊन तुमचा लुक पूर्ण करू शकता.

सोशल मीडियावर कौतुकाचा वर्षाव

हे फोटो समोर येताच इंस्टाग्राम, फेसबुकसह इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर चाहत्यांनी लाईक्स आणि कमेंट्सचा पाऊस पाडला आहे. “तू नेहमीच सुंदर दिसतेस”, “पिंक रंगात तू अधिकच खुलून दिसतेस. तिच्या या फोटोवरून कोणाची नजर हटत नाही.

### 45 वर्षीय श्वेता तिवारीचा दिलखेच अंदाज,स्लिट स्कर्टमध्ये घातला धुमाकूळ

अभिनयात आपली वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री श्वेता तिवारी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. यावेळी कारण ठरले आहे तिचा नुकताच व्हायरल झालेला पिंक हाय-स्लिट स्कर्टमधील एलिगंट लूक. 45 व्या वर्षीही श्वेताने आपल्या फॅशन सेन्सने आणि आत्मविश्वासाने वय ही केवळ एक संख्या आहे, हे पुन्हा सिद्ध करून दाखवले आहे.



सोशल मीडियावर तिचे हे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून चाहत्यांकडून तिला भरभरून कौतुक मिळत आहे. या लूकमध्ये श्वेताचा आत्मविश्वास विशेष लक्ष वेधून घेतो. कॅमेऱ्यासमोर तिच्या पोझ, एक्सप्रेशन्स आणि बॉडी लँग्वेजमधून तिचा अनुभव आणि कम्फर्ट स्पष्टपणे जाणवतो. पिंक रंगाचा हा हाय-स्लिट स्कर्ट आणि त्यासोबत मॅचिंग टॉप तिच्या व्यक्तिमत्त्वाला ग्लॅमरस टच देतो तर संपूर्ण लूकमध्ये एक एलिगन्सही दिसून येते. फॅशन इन्स्पिरेशन का ठरतो हा लूक

फॅशन इन्स्पिरेशन का ठरतो हा लूक

हा लूक केवळ एका फोटोशूटपुरता मर्यादित नाही. आजच्या काळात अनेक महिला वय, शरीरयष्टी किंवा समाजाच्या अपेक्षांमुळे फॅशनबाबत संकोच करतात.अशा वेळी श्वेता तिवारीसारखी अभिनेत्री खुलेपणाने, आत्मविश्वासाने स्वतःला सादर करते, तेव्हा ती इतर महिलांसाठी प्रेरणादायी ठरते. योग्य फिटिंग, योग्य रंग आणि स्वतःवरचा विश्वास असेल, तर कोणताही लूक सुंदर दिसू शकतो.

पिंक रंगातील ड्रेसने वेधले लक्ष

या फोटोशूटमध्ये श्वेता तिवारीने परिधान केलेला पिंक रंगाचा हाय स्लिट स्कर्ट आणि मॅचिंग टॉप हा लूक अतिशय रॉयल आणि क्लासी वाटतो. स्कर्टवरील नाजूक डिझाइन, पर्ल वर्क आणि स्लिट कटमुळे तिच्या व्यक्तिमत्त्वात ग्लॅमरची भर पडली आहे.

# कोणत्या लोकप्रिय मालिकेत झळकलेली 'मी सावित्रीबाई जोतीराव फुले'मधील छोटी सावी? चिमुरडीने जिंकलं प्रेक्षकांचं मन

'मी सावित्रीबाई जोतीराव फुले' ही अलिकडेच सुरू झालेली मालिका अल्पावधीत लोकप्रिय झाली आहे. सध्या या मालिकेमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या बालपणीचा काळ दाखवला जातो आहे. मालिकेमध्ये सध्या छोट्या सावीची भूमिका तक्षा शेट्टी ही चिमुरडी साकारत असून तिच्यावर सर्वच स्तरातून कौतुकाचा वर्षाव होतो आहे. तक्षाने यापूर्वीही एका लोकप्रिय मालिकेत काम केले होते, मात्र Mi Savitribai Jotirao Phule मध्ये तिने साकारलेल्या मुख्य भूमिकेने प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधले.

सावित्रीबाईंचा आत्मविश्वास आणि शिक्षणाप्रति असणारी ओढ तक्षाने तिच्या भूमिकेतून चपखल साकारली आहे. अनेक प्रसंगांमध्ये या छोट्या सावित्रीबाई अन्यायाविरोधात उभं राहिल्याचे आणि एखादी गोष्ट न समजल्यास त्याविषयी कुतुहल व्यक्त करताना दाखवल्या आहेत. तक्षाने हे हावभाव अचूक टिपले आणि परिणामी चाहत्यांसोबत ती अल्पावधीतच जोडली गेली.

तक्षा सोशल मीडियावर विशेष सक्रिय आहे. हे पात्र साकारायच्या आधीपासून ती इन्स्टाग्रामवर विविध व्हिडिओ शेअर करते. अभिनयासोबतच तिच्या डान्सची चुणूक दाखवणारे व्हिडिओ तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. तिने यापूर्वी एका लोकप्रिय मालिकेमध्येही काम केले होते.

तक्षा यापूर्वी कलर्स मराठीच्या 'इंद्रायणी' मालिकेत झळकली होती. सांची भोयरची मुख्य भूमिका असणाऱ्या या मालिकेतील छोट्या इंदूच्या टोळीतील ती एक सदस्य होती. तिने इंदूच्या जवळच्या मैत्रिणीची भूमिका साकारली होती. तक्षाच्या या मालिकेतील पात्राचे नाव 'परी' असे होते. या कथानकामध्ये लीप येण्यापूर्वी इंदू, परी आणि त्यांच्या संपूर्ण टोळीची धमाल पाहायला मिळायची. दीर्घकाळापर्यंत हे बालकलाकारच 'इंद्रायणी' मालिकेचे खरे स्टार होते.

दरम्यान अलिकडेच स्टार प्रवाह वाहिनीच्या अधिकृत सोशल मीडियावर तक्षाच्या



अभिनयाचे कौतुक करणारे विविध व्हिडिओ शेअर करण्यात आलेले. अभिनेत्री मधुराणी गोखले हिनेही तिचे कौतुक केले होते. छोट्या सावीचे कलाकारांनीच नव्हे तर प्रेक्षकांनीही विशेष कौतुक केले. तिच्याविषयी असंख्य सकारात्मक कमेंट सोशल मीडियाच्या माध्यमातून समोर आल्या आहेत.

## मध्ये अखेर अंजलीसमोर येणार नवऱ्याचा खरा चेहरा? अर्णवने राकेशची चांगलीच केली धुलाई

स्टार प्रवाहच्या Tu Hi Re Maza Mitwa या मालिकेमध्ये एकीकडे सध्या ईश्वरी तिच्या अर्णव सरांचा राग शांत करण्याचा आणि त्याचे प्रेम पुन्हा जिंकण्याचा प्रयत्न करते आहे. अर्णव ईश्वरीच्या आईला त्याच्या आईच्या मृत्यूसाठी जबाबदार ठरवत असल्याने त्यांच्या नात्यात दुरावा आला. आता मालिकेच्या नव्या प्रोमोनुसार अर्णव त्याच्या आयुष्यातील आणखी एका महत्वाच्या व्यक्तीला दुखावणार आहे. ही व्यक्ती म्हणजे अंजली आणि पुन्हा एकदा राकेशमुळेच हा ड्रामा घडणार आहे. यानंतर अंजलीसमोर राकेशचा खरा चेहरा येईल का, हे आगामी भागांमध्येच स्पष्ट होईल.

'तू ही रे माझा मितवा'च्या आगामी भागाच्या प्रोमोत असे दाखवले आहे की, राकेश ईश्वरीच्या मागे धावत येतो आणि तेव्हा ती शिडीवरुन जमिनीवर पडते. तिच्याकडे राकेशचं चेकबुक असतं आणि ते मिळवण्यासाठी तो धडपड करतो आहे. राकेश ईश्वरीला ईशारा देतो की, तिने ते चेकबुक परत करावं. तेव्हा ईश्वरी असं प्रत्युत्तर देते की, 'जीव गेला तरी मी तुझा डाव यशस्वी होऊ देणार नाही.' चवताळलेला राकेश तिचे पाय पकडून खेचतो, तिचा गळा पकडतो आणि तिथेच टेबलवर असणारा काचेचा जग तो तिच्या डोक्यात घालणार तेवढ्यात अर्णव तिथे धावत पोहोचतो. 'बायकोवर हात त्याला अर्णवची लाथ...' असे कॅप्शन देत नवीन प्रोमो सोशल मीडियावर शेअर करण्यात आला.प्रोमोमध्ये पुढे दाखवले आहे की, अर्णव राकेशला खाली पाडतो आणि त्यांच्यात हाणामारी होते. अर्वण त्याला पुन्हा एकदा जमिनीवर पाडतो आणि तो त्याला मारणार तेवढ्यात अंजली आणि आजी तिथे पोहोचतात. अंजली मोठ्याने तिच्या भावाला हाक मारुन थांबवते. आता अर्णवच्या कृतीमुळे अंजली दुखावली जाणार की, राकेशचा खरा चेहरा तिच्यासमोर आणला जाईल, हे आगामी भागात स्पष्ट होईल.



## पाप करणारा शिमग्याच्या दिवशी शंकासुराच्या हिटलिस्टवर! देवतळी गावची परंपरा की मोकाट सुटलेला सीरियल किलर?

कोकणात दरवर्षी गौरी-गणपतीप्रमाणेच शिमगा म्हणजेच होळी या सणाचा उत्साह पाहायला मिळतो. ग्रामदेवतेची पालखी, गावातील मोठा होम, नमन, दशावतार अन् संकासूर/शंकासूर यामुळे शिमग्याचा उत्साह शिगेला पोहोचलेला असतो. दरवर्षी असंख्य चाकरमनी मुंबई-पुण्याहून कोकणातील गावी पोहोचतात आणि हा सण साजरा करतात. रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये शिमगोत्सवात हा शंकासूर येतो. हीच प्रथा झी5 च्या आगामी 'देवखेळ' या सीरिजमध्ये पाहायला मिळणार आहे. मात्र या शंकासुराच्या प्रथेआड होणाऱ्या काळ्या कृत्याचा शोध या सीरिजमध्ये पाहायला मिळेल. नुकताच या सीरजचा ट्रेलर लॉन्च झाला.

'देवखेळ' मध्ये देवतळी या काल्पनिक गावातील कथा दाखवली आहे. शिमगोत्सवादरम्यान रात्री एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होतो आणि गावातील लोकांचा लोक असा विश्वास करतात की हा शंकासुरचा शाप आहे. संबंधित व्यक्तीने पाप केल्याने शंकासुराने त्याला शिक्षा म्हणून मारले, असा ग्रामस्थांचा समज असतो. एवढेच नव्हे तर होळी पौर्णिमेदिवशी देवतळीमध्ये पोलीस



बंदोबस्तही नसतो. जेव्हा गुहागर पोलीस ठाण्यात इन्स्पेक्टर विश्वास सरंजामे या गावात प्रवेश करतात, तेव्हा ते या 'शंकासुराने दिलेल्या शिक्षा' प्रकरणाचा शोध घेतात. शंकासूर शिक्षा देत नसून गावात खून होत आहेत, याची त्यांना खात्री असते. त्यामुळे यामागे कोणत्या सीरियल किलरचा हात आहे, याचा शोध ते घेऊ लागतात.

सीरिजमध्ये इन्स्पेक्टर विश्वास सरंजामेच्या भूमिकेत अभिनेता अंकुश चौधरी आहे. अंकुश या सीरिजच्या माध्यमातून ओटीटीवर पदार्पण करतो आहे. अंकुशसह अभिनेत्री प्राजक्ता माळीने यामध्ये महत्वाची भूमिका साकारली आहे. तिने सारिका निमकरची भूमिका साकारली आहे. सारिका ही इन्स्पेक्टर विश्वास यांचा भूतकाळ आहे आणि तिच्याशी संबंधित एका व्यक्तीची हत्यादेखील झाली आहे. सरंजामेला तिच्यावरही संशय असतो. आता सीरियल किलर नेमका कोण आहे हे सीरिज रीलिज झाल्यानंतरच स्पष्ट होईल.

अंकुश-प्राजक्तासह अरुण नलावडे, नारायण जाधव, यतीन कार्येकर, मंगेश देसाई, वीणा जामकर, ओंकार भोजने, सायली देवधर, विनायक जाधव हे अशी स्टारकास्टही या सीरिजमध्ये आहे. चंद्रकांत गायकवाड दिग्दर्शित ही वेब सीरिज Z5 वर 30 जानेवारी रोजी रीलिज होणार आहे.

# नाना पाटेकरांनी एक तास वाट पाहिली आणि वैतागून निघून गेले

O Romeo हा शाहिद कपूर आणि तृप्ती डिमरी यांचा सिनेमा विशेष चर्चेत आला आहे. 21 जानेवारी 2026 रोजी मुंबईतील अंधेरी याठिकाणी विशाल भारद्वाज यांच्या या चित्रपटाचा ट्रेलर आणि पोस्टर लॉन्च सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमापूर्वी घडलेल्या एका घटनेची सोशल मीडियावर चर्चा होते आहे. 'ओ रोमिओ'मध्ये ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर एका महत्वाच्या भूमिकेत झळकणार आहेत. सिनेमाचा ट्रेलर लॉन्च सोहळा सुरू होण्याआधीच नाना तिथून बाहेर पडले होते. जाणून घ्या नेमकं काय घडलं?

लाँच कार्यक्रमाचे असे आयोजन करण्यात आलेले की, सिनेमाच्या पोस्टरचे अनावरण सकाळी 11 वाजता अंधेरीतील एका मॉलमध्ये होणार आणि दुपारी 12 वाजता त्याच मॉलच्या थिएटरमध्ये ट्रेलर लॉन्च होणार होता. नाना 12 वाजता ट्रेलर लॉन्ससाठी थिएटरमध्ये वेळेत पोहोचले होते. मात्र पोस्टर लॉन्चचा कार्यक्रम उशिरा सुरू झाला आणि परिणामी पुढेही उशीर झाला. पोस्टरचे अनावरण होईपर्यंत दुपारी 1 वाजला. शाहिद कपूर, तृप्ती डिमरी आणि इतर काही कलाकार ट्रेलर लॉन्चसाठी एक-दीड तास उशिरा आले आणि नाना पाटेकर त्यांची वाट पाहत थांबले होते. ते या एकंदरित प्रकारामुळे वैतागले होते आणि ट्रेलर लॉन्चसाठी उपस्थित राहिले नाहीत, कार्यक्रम सुरू होण्यापूर्वीच तिथून निघून गेले होते.

ठरल्या वेळेप्रमाणे कार्यक्रम पार न पडल्याने नाना पाटेकर कार्यक्रमस्थळावरुन निघून गेल्याची बातमी सोशल मीडियावर वाऱ्याच्या वेगाने पसरली.




# 'आई कुठे काय करते' फेम अभिनेत्रीचा राकेश बापटला पाठिंबा

मुंबई - ' बिग बॉस मराठी ६ ' मध्ये पहिल्या दिवशी तन्वी कोलतेचं घरातील सदस्यांसोबत पहिल्या दिवशी भांडण झालं. त्यामुळे ती चर्चेत आली. मात्र, गेल्या आठवड्यात भाऊच्या धक्क्यावर रितेशनं इतर स्पर्धकांचा गेम दिसत नाही म्हणून फटकारलं. त्यापैकी एक म्हणजे अनुश्री माने. अनुश्री मानेनं दुसऱ्याच आठवड्यात तिचे रंग दाखवायला सुरुवात केली. राकेश बापटवर नको ते आरोप केल्यामुळे अनुश्री चर्चेत आली. बिग बॉसच्या घरात राकेशने माझा हात खेचला, माझ्या परवानगीशिवाय कोणीही हात लावू शकत नाही, असं अनुश्री म्हणाली. तिच्या या आरोपांमुळे राकेश दुखावला. अशातच आता राकेश बापटला कलाकारांचा आणि त्याचबरोबर चाहत्यांचा सपोर्ट मिळत आहे. 'आई कुठे काय करते' फेम अभिनेत्रींनंही राकेशच्या समर्थनार्थ पोस्ट शेअर केली आहे.

'आई कुठे काय करते' फेम रुपाली भोसले सोशल मीडियावर कायम सक्रीय असते. समाजात घडत असलेल्या अनेक घडामोडींवर अभिनेत्री भाष्य करते. अशातच आता रुपालीनं राकेश बापटसाठी पोस्ट शेअर केली आहे. रुपालीनं इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत लिहिलं की, 'सिरीयसली...परत एकदा विचारतेय कोण आहेत ह्या मुली? राकेश तू नको इतका त्रास करून घेऊस...आम्ही सगळे आहोत तुझ्यासोबत...तू खरंच जेंटलमॅन आहेस...दुसरा कोण असता तर राडा केला असता...पण तू खूप चांगल्या पद्धतीने हाताळलंस सगळं.'

त्याचबरोबर अभिनेत्रीनं पुढे सागर कारंडेचंही कौतुक केलं आहे. रुपालीनं पुढे लिहिलं, 'सागर तू कमाल आहेस आणि तसाच तू दिसतोयस... तू ज्या पद्धतीने ह्या परिस्थितीमध्ये राकेशसोबत उभा आहेस आणि ती परिस्थिती तू जशी हाताळलीस...आदर वाटतो मित्रा'

इतकंच नव्हे तर अभिनेत्री नेहा शितोळेनंही राकेश बापटला सपोर्ट केलं असून त्याच्यासाठी सोशल मीडियावर



पोस्ट शेअर केली आहे. नेहानं लिहिलं की, ' राकेश बापट या प्रकरणात मी तुझ्यासोबत आहे. माझा तुला पाठिंबा आहे. या मुली अत्यंत वाईट पद्धतीने गेम खेळत आहेत. एक स्त्री म्हणून मी तुझी माफी मागते. हे अजिबातच योग्य नाही.'

## अर्थविश्व...

### शेअरनं गुंतवणूकदार 3 वर्षात करोडपती, पण आता स्टॉकचा उलटा प्रवास, 6 महिन्यांत 33 टक्के घसरण



बाजारातील कोणता शेअर कधी गुंतवणूकदाराला मालामाल करेल आणि कधी अचानक कोसळेल हे सांगता येत नाही. एका शेअरने गुंतवणूकदारांना कोट्याधीश केले आता मात्र या शेअरमुळे त्यांचे मोठे नुकसान होत आहे. पीजी इलेक्ट्रोप्लास्ट (PG Electroplast Share ) चा हा शेअर आहे. या शेअरने 2 रुपयांवरून 600 रुपयांपर्यंत भरारी घेतली. मात्र, गेल्या 12 दिवसांपासून या शेअरमध्ये सतत घसरण दिसून येत आहे.

3 वर्षात लाखांचे दोन 2 कोटी करणारा शेअर

एप्रिल 2022 रोजी पीजी इलेक्ट्रोप्लास्ट शेअरची किंमत केवळ 2.89 रुपये होती. हा शेअर 5 जानेवारी रोजी 630 रुपयांवर पोहोचला होता. या काळात गुंतवणूक दारांना 20000% हून जास्त परतावा मिळाला. जर एखाद्या गुंतवणूकदाराने 3 एप्रिल 2022 रोजी कंपनीच्या शेअरमध्ये 1 लाख रुपयांची गुंतवणूक केली असती तर त्याची आता रक्कम 2 कोटीहून अधिक झाली असती.

शेअरमध्ये घसरणीचे कारण?

सध्या या शेअरमध्ये गेल्या 12 दिवसांपासून घसरण सुरू आहे. बुधवारी पीजी इलेक्ट्रोप्लास्ट शेअरमध्ये 2.85% ची घसरण झाली आणि तो 533 रुपयांवर आला. 5 जानेवारीपासून या शेअरमध्ये सतत घट दिसून येत आहे. या काळात शेअर 15.72% पर्यंत घसरला आहे. या शेअरमध्ये झालेल्या अलीकडील घसरणीचे कारण कंपनीच्या डिसेंबर शेअरहोल्डिंग पॅटर्ननुसार, स्मॉल रिटेल इन्व्हेस्टर्सनी आपली हिस्सेदारी कमी केली आहे. सप्टेंबर तिमाहीत ही हिस्सेदारी 18.78% होती. डिसेंबर तिमाहीच्या शेवटी 2.18 लाख रिटेल गुंतवणूकदारांकडे 16.5% हिस्सेदारी होती. जी सप्टेंबर तिमाहीच्या तुलनेत 2.28% कमी आहे.

कंपनी काय करते?

PG Electroplast ही पीजी ग्रुपची प्रमुख कंपनी आहे, जी कन्झ्युमर इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनांशी संबंधित आहे. ही कंपनी टीव्ही, वॉशिंग मशीन, AC साठी प्लास्टिकचे पार्ट्सचे उत्पादन बनवते. मात्र, ही कंपनी ही उत्पादने स्वतःच्या ब्रँड नावाने विकत नाही, तर विविध ब्रँड कंपन्यांसाठी उत्पादन करते.

### Zomato च्या मुख्य कंपनीच्या सीईओंचा राजीनामा, मोठ्या योगदानानंतर पायउतार, भविष्यातील प्लान सांगितला




कॉर्पोरेट जगतातून एक मोठी घडामोड समोर येत आहे. झोमॅटोची मुळ कंपनी असलेल्या इटरनल ग्रुपचे सीईओ दीपिंदर गोयल यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी स्वतः सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर ही माहिती दिली. गोयल यांनी सांगितले की, भागधारकांच्या मंजुरीनंतर ते आता कंपनीच्या बोर्डात वाइस चेअरमन म्हणून काम पाहतील, तर अलबिंदर ढींडसा इटरनल ग्रुपचे नवीन ग्रुप सीईओ असतील.

गोयल यांचे योगदान

दीपिंदर गोयल यांचा हा राजीनामा अशा वेळी आला आहे, जेव्हा इटरनल ग्रुप आपल्या विस्ताराच्या आणि धोरणात्मक पुनर्रचनेच्या प्रक्रियेतून जात आहे. गोयल यांनी आपल्या कार्यकाळात कंपनीला मजबूत करण्यात, नवीन व्यवसाय धोरणे लागू करण्यात आणि स्पर्धात्मक बाजारपेठेत कंपनीची उपस्थिती बळकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या नेतृत्वाखाली इटरनल ग्रुपने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले, ज्यांचा कंपनीच्या दीर्घकालीन वाढीवर परिणाम दिसून आला.

गोयल यांनी आपल्या निर्णयामागील कारणेही सविस्तरपणे सांगितली. त्यांनी म्हटले की, अलीकडील काळात त्यांना काही नवीन कल्पनांवर काम करायचे आहे, ज्यात अधिक धोका, प्रयोग आणि शोध यांचा समावेश आहे. असे प्रयोग सार्वजनिक कंपनीच्या कक्षेत बसत नाहीत. त्यांनी स्पष्ट केले की, जर हे विचार इटरनलच्या धोरणात्मक कक्षेत असते, तर त्यांनी ते कंपनीतच पुढे नेले असते. परंतु तसे नाही. अशा परिस्थितीत, इटरनल पूर्णपणे केंद्रित आणि शिस्तबद्ध राहणे आवश्यक होते.

कंपनीपासून दूर जाणार नाही

गोयल यांनी हेही मान्य केले की, भारतात एका सार्वजनिक कंपनीच्या सीईओवर कायदेशीर आणि इतर जबाबदाऱ्यांचे दडपण असते, ज्यासाठी पूर्ण एकाग्रता आवश्यक असते. हेच कारण आहे की हा बदल करण्यात आला. दीपिंदर गोयल यांनी स्पष्ट केले की, हा निर्णय कंपनीपासून दूर जाण्याचा नाही. त्यांनी लिहिले की, त्यांनी आपल्या आयुष्यातील 18 वर्षे, म्हणजे जवळपास अर्धे आयुष्य, ही कंपनी उभारण्यासाठी दिले आहे आणि ते पुढेही याच्याशी जोडलेले राहतील. त्यांनी म्हटले की, "ते कंपनीच्या दीर्घकालीन धोरणांमध्ये, कंपनी संस्कृतीत, नेतृत्व विकासात आणि नैतिकता व प्रशासनाशी संबंधित निर्णयांमध्ये सक्रिय भूमिका बजावत राहतील."

ढींडसांचं कौतुक

गोयल यांनी हेही आश्वासन दिले की, अलबिंदर ढींडसा, अक्षांत आणि ते पूर्वीप्रमाणेच एकत्र काम करत राहतील आणि सर्व व्यवसाय सीईओंना पूर्वीप्रमाणेच स्वायत्तता मिळेल.गोयल यांनी अलबिंदर ढींडसा यांचे कौतुक करत लिहिले की, ब्लिंकइटच्या अधिग्रहणापासून ते ब्रेकईवनपर्यंत पोहोचवण्यात ढींडसा यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. त्यांनी टीम, पुरवठा साखळी, संस्कृती आणि कार्यान्वयन प्रणाली मजबूत केली. गोयल यांच्या मते, अलबिंदर एक "battle-hardened founder" आहेत आणि त्यांची अंमलबजावणी क्षमता अत्यंत चांगली आहे. गोयल म्हणाले, त्यांचे आर्थिक भविष्य अजूनही इटरनलशी जोडलेले आहे आणि त्यांचे हित दीर्घकालीन भागधारक मूल्याशी जोडलेले राहील.

# अभिषेक शर्माने वर्ल्ड रेकॉर्डसह रचला इतिहास सूर्या-युवराजसह कोहलीचाही रेकॉर्ड मोडला

नागपूर : अभिषेक शर्माने तुफानी फटकेबाजी करत न्यूझीलंडच्या गोलंदाजांना आपल्यापुढे लोटांगण घालायला भाग पाडले.

अभिषेकने यावेळी सूर्यकुमार यादवचा वर्ल्ड रेकॉर्ड तर मोडला, पण त्याने आपलाच गुरु असलेल्या युवराज सिंगलाही मागे टाकले. पण अभिषेक शर्माने यावेळी विराट कोहलीचा महारेकॉर्डही मोडल्याचे समोर आले.

### गुरु युवराज सिंगचा कोणता विक्रम मोडला...

युवराज सिगं हा क्रिकेट विश्वात अजूनही सिक्सर किंग म्हणून ओळखला जातो. पण या सामन्यात अभिषेक शर्माने युवीचाही रेकॉर्ड मोडला आहे. युवराज सिंगने टी २० क्रिकेटमध्ये ७४ षटकार मारले होते. पण युवीचा हा विक्रम आता अभिषेक शर्माने मोडीत काढला आहे. या सामन्यात अभिषेकने तब्बल आठ षटकार लगावले. त्यामुळे आता टी २० क्रिकेटमध्ये त्याच्या नावावर ८१ षटकार नोंदवले गेले आहेत.

### विराट कोहलीचा महारेकॉर्डही मोडला...

विराट कोहली सातत्याने धावा करत आहे आणि एकामागून एक विक्रम तो आपल्या नावावर करत आहे. पण या सामन्यात तर अभिषेक शर्माने विराटचा मोठा विक्रमही मोडीत काढला. विराटने टी २० करीअरमध्ये ५००० धावा या १६७ डावांत पूर्ण केल्या होत्या. टी २० क्रिकेटमध्ये एवढ्या धावा करणं हा एक मोठा विक्रम समजला जातो. पण अभिषेकने यावेळी विराटचा विक्रम मोडताना आपल्या पाच हजार धावा १६५ धावांत पूर्ण करत आता विराटलाही मागे टाकले आहे.

### सूर्याचा वर्ल्ड रेकॉर्ड मोडला...

भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवला टी २० क्रिकेटचा दादा समजले जाते. पण सूर्याचा वर्ल्ड रेकॉर्ड आता अभिषेकने मोडला आहे. अभिषेकने या सामन्यात ८४ धावांचा पाऊस पाडला. सूर्याने तुफानी




फटकेबाजी करताना आपली सात अर्धशतकं २५ पेक्षा कमी चेंडूंत पूर्ण केली होती. म्हणजेच २०० पेक्षा जास्त त्याचा स्ट्राइक रेट होता. पण अभिषेक शर्माने आता आपले आठवे अर्धशतक हे २५ पेक्षा कमी चेंडूंमध्ये पूर्ण केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सूर्याचा वर्ल्ड रेकॉर्डही अभिषेकने आपल्या नावावर केला आहे.

# तुफानी कमबॅक, तरीही मनात सल!

### रिंकू सिंग विजयातही नाराज का?



नागपूर : रिंकू सिंगने भारतीय संघात कमबॅक करताना तुफानी खेळी साकारली. आपल्या धडाकेबाज फटकेबाजीच्या जोरावर रिंकूने न्यूझीलंडला आपल्यापुढे लोटांगण घालायला भाग पाडले. रिंकूमुळेच भराताला दोनशे धावांचा पल्लाही ओलांडता आला. त्यामुळे भारताच्या विजयाचा पाया रचला गेला. पण न्यूझीलंडची धुलाई करून विजय मिळवल्यावरही रिंकू सिंगला एका गोष्टीचं सर्वात वाईट वाटत होतं. सामना संपल्या रिंकू सिंगने ही गोष्ट सांगितली.

अभिषेक शर्मा बाद झाल्यावर भारताचा रन रेट कमी होईल, असे वाटत होतं. पण त्यानंतर रिंकू सिंग फलंदाजीला आला आणि त्याने न्यूझीलंडच्या तोंडचं पाणीच पळवलं. कारण रिंकू सिंगने यावेळी फक्त २० चेंडूंत नाबाद ४४ धावांची धमाकेदार खेळी साकारली, यामध्ये ४ चौकार आणि तीन षटकारांचा समावेश होता. रिंकू सिंगचा स्ट्राइक रेट यावेळी २२० एवढा होता. रिंकूच्या धमाकेदार फटकेबाजीमुळे यावेळी भारताला २३८ धावांचा डोंगर उभारता आला. भारताची ही न्यूझीलंडविरुद्धची सर्वाधिक धावसंख्या ठरली ती रिंकूच्या फटकेबाजीमुळे. भारताने जिथे रिंकूच्या फटकेबाजीच्या जोरावर २३८ धावा उभारल्या तिथेच भारताचा विजय जवळपास निश्चित झाला होता. भारताने सहजपणे हा सामना जिंकलाही, पण त्यानंतरही रिंकू सिंग हा नाराज असल्याचे पाहायला मिळाले.

रिंकू सिंग सामना संपल्यावर म्हणाला की, " माझ्यासाठी हा कमबॅकचा सामना होता. जेव्हा तुम्ही संघात कमबॅक करत असता तेव्हा थोडंस दडपम असतं. पण मी यावेळी मैदानात तसा शांत होतो. या सामन्यात चांगली कामगिरी करून संघाला मोठी धावसंख्या उभारुन द्यायची हे डोक्यात होतं. अर्शदीप सिंगबरोबर खेळतानाही चांगली मजा आली. या सामन्यात चांगली फटकेबाजी करू शकलो, याचा एकाबाजूला आनंद तर आहेच. भारताला विजय मिळाला, पण मला एका गोष्टीचे वाईट वाटते. मी या सामन्यात जेव्हा फिल्डिंग करत होतो, तेव्हा माझ्या हातून एक कॅच सुटली, मला या गोष्टाचे वाईट वाटते. "

रिंकू सिंग हा आक्रमक फलंदाज असला तरी किती साधा सरळ माणूस आहे आणि तो किती प्रामाणिक आहे, हे यावेळी पाहायला मिळाले.

# ICC म्हणाले- बांगलादेशचे वर्ल्डकप सामने भारतातच होतील

### वेळापत्रक बदलण्यासही नकार, एका दिवसात उत्तर मागितले

बांगलादेशला आपले टी-२० विश्वचषकाचे सामने भारतातच खेळावे लागतील. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) बांगलादेश क्रिकेट बोर्डाला (BCB) विचार करण्यासाठी आणखी एक दिवसाचा वेळ दिला. जर BCB ने नकार दिला, तर त्यांच्या जागी स्कॉटलंडला संधी मिळेल.

क्रिकइन्फोनुसार, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (ICC) बैठकीत १६ पैकी १४ देशांनी BCB च्या विरोधात मतदान केले. त्यांना फक्त पाकिस्तानने पाठिंबा दिला. मात्र, आता २२ जानेवारी रोजी बांगलादेश ICC स्पर्धा खेळणार की नाही, याचा निर्णय होईल.

बुधवारी ICC ने BCB आणि इतर सदस्यांसोबत बैठक घेतली. ICC ने सांगितले की, जर बांगलादेश स्पर्धेत खेळण्यासाठी भारतात गेला नाही, तर त्यांना दुसऱ्या संघाने बदलले जाईल. ICC च्या बहुतेक सदस्यांनी बैठकीत या निर्णयाला पाठिंबा दिला. त्यानंतर BCB ला विचार करण्यासाठी आणखी एक दिवसाचा वेळ देण्यात आला.

आयसीसीने असेही म्हटले आहे की, सुरक्षा मूल्यांकनात असे समोर आले आहे की बांगलादेशचे खेळाडू, माध्यम प्रतिनिधी, अधिकारी आणि चाहत्यांना भारतात कोणताही धोका नाही. त्यामुळे ठिकाण बदलण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.आयसीसीने बांगलादेश क्रिकेट संघाला आणखी एक दिवसाचा वेळ दिला आहे.

आयसीसीने बांगलादेश क्रिकेट संघाला आणखी एक दिवसाचा वेळ दिला आहे.

बांगलादेश विश्वचषकातून



बाहेर पडल्यास काय होईल?

बांगलादेशच्या जागी स्कॉटलंडला विश्वचषकात प्रवेश मिळेल. स्कॉटलंडचा संघ युरोपियन क्वालिफायरमध्ये नेदरलँड्स आणि इटलीनंतर तिसऱ्या स्थानावर होता. अशा परिस्थितीत त्यांना गट-सी मध्ये स्थान मिळेल आणि संघ बांगलादेशचे सर्व सामने खेळेल.

टी-20 विश्वचषकात बांगलादेशला गट-सी मध्ये ठेवण्यात आले आहे. संघ 7 फेब्रुवारीला वेस्ट इंडिज, 9 फेब्रुवारीला इटली आणि 14 फेब्रुवारीला इंग्लंडशी भिडणार आहे. हे तिन्ही सामने कोलकाता येथील ईडन गार्डन्स स्टेडियममध्ये खेळले जाणार आहेत. तर संघाचा शेवटचा गट-स्तरीय सामना 17 फेब्रुवारीला मुंबईत नेपाळशी होणार आहे.

यादरम्यान, बांगलादेशचा टी-20 कर्णधार लिटन दासने मंगळवारी BPL सामन्यानंतर सांगितले- 'विश्वचषक अजून खूप दूर आहे. आम्ही विश्वचषकात जाऊ की नाही हे देखील आम्हाला अजून निश्चित नाही.'

दास म्हणाले की, त्यांना या प्रकरणी BCB कडून कोणतीही माहिती मिळालेली नाही. माझ्यासारखाच संपूर्ण बांगलादेश सध्या संभ्रमात आहे. मला माहीत नाही, पण माझ्याशी कोणीही बोलले नाही. आयुष्यात अनेक गोष्टी आदर्श नसतात, पण परिस्थितीनुसार त्या स्वीकाराव्या लागतात.

सुरक्षा कारणांमुळे बांगलादेश टी-20 विश्वचषकातील आपले सामने भारतात खेळू इच्छित नाही. याच संदर्भात बांगलादेश क्रिकेट बोर्ड (BCB) ने ICC कडे मागणी केली होती की संघाचे सामने सह-यजमान श्रीलंकेत आयोजित केले जावेत. तथापि, ICC ने ही मागणी फेटाळून लावली होती. यानंतर BCB ने पुन्हा ICC ला मेल लिहिला.

17 जानेवारी रोजी ICC आणि BCB यांच्यात झालेल्या बैठकीत बांगलादेशने स्पष्टपणे सांगितले की त्यांना टी-20 विश्वचषक खेळायचा आहे, पण भारताबाहेर. यावरही ICC आपल्या निर्णयावर ठाम आहे. कौन्सिलने स्पष्ट केले आहे की स्पर्धेचे वेळापत्रक बदलणार नाही आणि बांगलादेशला गट-C मध्येच खेळावे लागेल.

दुसरीकडे, बांगलादेश सरकारचे क्रीडा सल्लागार आसिफ नजरुल म्हणाले की, जर ICC भारतीय बोर्डाच्या दबावाखाली झुकले आणि आमच्यावर अयोग्य अटी लादण्याचा प्रयत्न केला, तर आम्ही अशा अटी स्वीकारणार नाही. त्यांनी भारतात न खेळण्याची भूमिका पुन्हा एकदा मांडली आहे.

बांगलादेशात होत असलेल्या हिंदूंच्या हत्यांनंतर, BCCI च्या सांगण्यावरून कोलकाता नाइट रायडर्स (KKR) ने बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला IPL 2026 मधून मुक्त केले होते. यामुळे संतप्त झालेल्या BCB ने आपले सामने भारताबाहेर खेळवण्याची मागणी करण्यास सुरुवात केली.

17 जानेवारीच्या बैठकीत BCB ने गट बदलण्याची मागणी केली होती, जी ICC ने फेटाळली. ICC ने BCB ला हे आश्वासनही दिले की बांगलादेश संघाला कोणताही विशेष सुरक्षा धोका नाही.

बांगलादेश क्रिकेट बोर्डाने ICC ला सांगितले होते की त्याला गट-C ऐवजी दुसऱ्या गट-B मध्ये समाविष्ट केले जावे. बोर्डाचा युक्तिवाद होता की असे झाल्यास बांगलादेशला आपले सर्व सामने श्रीलंकेत खेळावे लागतील, ज्यामुळे प्रवास आणि सुरक्षेशी संबंधित अडचणी कमी होतील.

सध्याच्या वेळापत्रकानुसार, आयर्लंडला त्यांचे गट-बी मधील सामने श्रीलंका, ऑस्ट्रेलिया आणि ओमानविरुद्ध कोलंबोमध्ये खेळायचे आहेत, तर त्यांचा शेवटचा सामना कँडीमध्ये झिम्बाब्वेशी होईल. दुसरीकडे, बांगलादेशला त्यांच्या सध्याच्या गट-सी मध्ये वेस्ट इंडिज, इटली आणि इंग्लंडविरुद्ध कोलकातामध्ये तीन सामने खेळायचे आहेत,

# KKRने दिशांत याग्निकला क्षेत्ररक्षण प्रशिक्षक बनवले

### अभिषेक नायर आणि ड्वेन ब्राव्हो यांच्यासोबत काम करतील, आयपीएलचे 25 सामने खेळले आहेत

कोलकाता नाइट रायडर्स (KKR) ने माजी यष्टीरक्षक फलंदाज दिशांत याग्निक यांची नवीन क्षेत्ररक्षण प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. फ्रँचायझीने बुधवारी सांगितले की, याग्निक इंडियन प्रीमियर लीग 2026 मध्ये त्यांच्या अनुभव आणि कौशल्याने संघाला बळकटी देतील.

KKR ने एक निवेदन जारी करत म्हटले की, 'IPL 2026 मध्ये संघ एका नवीन आणि बदललेल्या सपोर्ट स्टाफसह मैदानात उतरेल. या युनिटचे नेतृत्व प्रशिक्षक अभिषेक नायर करतील.' फ्रँचायझीनुसार, याग्निक यांचे KKR शी जोडले जाणे त्यांच्या कोचिंग कारकिर्दीतील एक नवीन आणि रोमांचक अध्याय आहे.

स्टाफमध्ये मेंटर ड्वेन ब्राव्हो, सहाय्यक प्रशिक्षक शेन वॉटसन, गोलंदाजी प्रशिक्षक टीम साउदी आणि पॉवर कोच आंद्रे रसेल यांचा समावेश आहे. IPL 2026 चे आयोजन 26 मार्च ते 31 मे दरम्यान होईल.

याग्निकने राजस्थानकडून चार हंगामात आयपीएल सामने खेळले.

याग्निकने राजस्थानकडून चार हंगामात आयपीएल सामने खेळले.

याग्निक २५ आयपीएल सामने खेळले आहेतदिशांत याग्निक विकेटकीपर फलंदाज होते. त्यांनी घरगुती क्रिकेटमध्ये राजस्थानचे प्रतिनिधित्व केले आहे. ते २०११ ते २०१४ दरम्यान आयपीएलमध्ये २५ सामने खेळले आहेत. निवृत्तीनंतर याग्निक आयपीएलशी जोडले गेले आहेत आणि अनेक हंगामात फिल्डिंग प्रशिक्षकाची भूमिका बजावली आहे.

मागील हंगामात अभिषेकला मुख्य प्रशिक्षक बनवले होते

केकेआरने मागील हंगामात अभिषेक नायरला आपला मुख्य प्रशिक्षक बनवले होते. ते चंद्रकांत पंडित यांच्या जागी मुख्य प्रशिक्षक बनवले गेले होते. त्यांच्यासोबत डेव्हॉन ब्राव्हो देखील केकेआरच्या कोचिंग स्टाफमध्ये आहेत.


WPL मध्ये दिल्लीचा दुसरा विजय, मुंबईला 7 गडी राखून हरवले

विमेन्स प्रीमियर लीग (WPL) मध्ये दिल्ली कॅपिटल्सला दुसरा विजय मिळाला. संघाने वडोदरा येथील कोटाम्बी स्टेडियममध्ये मुंबई इंडियन्सला 7 गडी राखून हरवले. प्रथम फलंदाजी करताना मुंबईने 154 धावा केल्या, दिल्लीने 19 षटकांत लक्ष्य गाठले.



## महत्त्वाचे...

### बिबट्याचा महिलेवर जीवघेणा हल्ला



बीड: जिल्ह्याच्या शिरूर कासार तालुक्यातील रूपूर शिवारात बुधवारी सकाळी बिबट्याने एका महिलेवर जीवघेणा हल्ला केल्याची थरारक घटना घडली आहे. कपाशीच्या शेतात कापूस वेचणी करत असताना हा हल्ला झाला. सुदैवाने, आजूबाजूला असलेले शेतकरी मदतीला धावून आल्याने मोठा अनर्थ टळला असला तरी, या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात दहशतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोळवाडी येथील रहिवासी असलेल्या विठाबाई शिवराम नेटके या रूपूर शिवारातील डोंगरपट्ट्यालगत असलेल्या आपल्या शेतात कापूस वेचणीचे काम करत होत्या. सकाळी कामात मग्न असताना, शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक त्यांच्यावर झडप घातली. बिबट्याच्या या हल्ल्यात विठाबाई गंभीर जखमी झाल्या. हल्ला होताच त्यांनी आरडाओरडा केला, ज्यामुळे जवळच असलेल्या शेतातील इतर शेतकरी आणि मजूर तातडीने त्यांच्या दिशेने धावले. नागरिकांचा वाढता आरडाओरडा आणि जमाव पाहून बिबट्याने तिथून पळ काढला. जखमी विठाबाईंना तातडीने शिरूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलवण्यात आले. तिथे प्राथमिक उपचार केल्यानंतर, जखमांचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांना पुढील उपचारासाठी बीडच्या जिल्हा रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे.

### शरीर संबंधासाठी हट्ट, शेतकऱ्याला संपवलं..

छत्रपती संभाजीनगर: कन्नड तालुक्यातील जामडी फॉरेस्ट शिवारात सापडलेल्या अनोळखी मृतदेहाच्या खुनाचा गुन्हा अखेर उघडकीस आला. या प्रकरणात खून करणाऱ्या महिला व तिच्या अठरा वर्षीय मुलाला ताब्यात घेण्यात आले. क्राईम पेट्रोल, सीआयडी, दृष्यम तसेच मोबाईलवर खुन प्रकरणात असलेल्या पुराव्यांची माहिती घेत, अत्यंत प्लानिंग आणि कोणताही तांत्रिक पुरवा राहणार नाही. अशा पदधतीने हा खुन करण्यात आला. या प्रकरणात वंदना राजू पवार (वय ४५) व धीरज उर्फ टेमा राजू पवार (वय १९, दोघे रा. जामडी फॉरेस्ट शिवार, ता. कन्नड) अशी अटक आरोपींची नावे आहेत. अशी माहिती पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी अपर पोलिस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह उपस्थित होत्या.यावेळी पोलिस अधिक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी दिलेल्या माहितीनुसार, खुनाची घटना ही १३ जानेवारी रोजी उघडकीस आली. पोलिसांनी मृत व्यक्ती हा जामडी गावातील राजु रामचंद्र पवार (रा. जामडी, कन्नड) अशी ओळख पटविली. खुनाच्या घटनेनंतर आरोपींचा शोध पोलिसांनी सुरू केला. यासाठी स्थानिक गुन्हे शाखा, कन्नड ग्रामीण पोलिस, डॉग स्क्वॉड व फॉरेन्सिक पथक घटनास्थळावरून मारेकऱ्यांचा माग सूरू केला. घटनास्थळी मृताच्या अंगावरील अंडरवेअर, चप्पल व फुटलेला मोबाइल अशी सापडली होती. जंगलाचा भाग असल्यामुळे तांत्रिक पुराव्यांचा अभाव होता. या तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे दोन पथक तयार करण्यात आले होते. या खुनाचा तपास करण्यासाठी ६० ते ७० संशयीताची पोलिसांनी कसून चौकशी केली. मृतदेह सापडलेल्या ठिकाणा लगतचे शेत राजू जोधा पवार यांचे असून त्याची देखभाल पत्नी वंदना व मुलगा धीरज करत असल्याची माहिती समोर आली.

# सुनावणी झाली असती तर धक्का बसला असता!

## अपेक्षेप्रमाणे तारीख पुढे ढकलल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे आभार, सुषमा अंधारेंची उपरोधक टीका

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

शिवसेनेच्या सत्तासंघर्षाची सुप्रीम कोर्टातील आजची सुनावणी पुन्हा लांबणीवर टाकण्यात आली. ही सुनावणी परवा म्हणजे शुक्रवारी 23 जानेवारी रोजी होणार असल्याची माहिती आहे. पण विधिज्ञ असीम सरोदे यांनी ही सुनावणी शुक्रवारी होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचा दावा केला आहे. आता शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी देखील ट्विट करत म्हटले की, माननीय सर्वोच्च न्यायालयाने आमच्या अपेक्षेप्रमाणे तारीख पुढे ढकलल्याबद्दल जाहीर आभार! असे म्हणत उपरोधक टीका केली आहे.

सुषमा अंधारे यांनी मंगळवारी देखील या प्रकरणी ट्विट करत म्हटले होते की, 37 नंबरचे मॅटर कधी बोर्डावरच येणार नाही. आपण भाबडा आशावाद सोडूया आणि ताकदीने लढू या, असे ट्विट त्यांनी केले होते. तसेच आज पुन्हा ट्विट करत त्यांनी या प्रकरणी म्हटले की, आज सुनावणी झाली असती तर मात्र धक्का बसला असता.

विधिज्ञ असीम सरोदे यांनी देखील ट्विट करत म्हटले होते की, 37 नंबरचे मॅटर सुनावणीसाठी रिच होणे कठीण आहे. आता लोकांचा नवीन प्रश्न - जर एकनाथ शिंदेंकडून पक्ष चिन्ह व शिवसेना नाव काढून घेतले तर मुंबई महापालिकेत काय होईल? मला वाटते शिंदेसेना भाजपमध्ये विलीन होईल व एकनाथ शिंदे यांचे राजकीय महत्त्व एकदम कमी होईल. शिंदेसेनेतील अनेकजण उद्धव ठाकरेंकडे स्वगृही परत जातील व मूळ शिवसेना अधिक ताकदवान होईल. उद्धव आणि राज ठाकरे मिळून मुंबई महापालिकेतील राजकारण फिरवू शकतील. सर्वोच्च न्यायालयातील एका निर्णयामुळे सुरु झालेला खेळ सर्वोच्च न्यायालयाच कधीतरी संपवेल, असे त्यांनी ट्विट करत म्हटले होते.

दरम्यान, सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वातील खंडपीठापुढे आज शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्ष व चिन्हाशी संबंधित वादावर सुनावणी होणार होती. हे प्रकरण कोर्टात 37 व्या क्रमांकावर लिस्टेड होते. त्यावर सकाळच्या सत्रात 11.30 वाजता सुनावणी सुरू होऊन ती सलग 2 दिवस चालणे अपेक्षित होते. पण आज अचानक कोर्टापुढे अरावली पर्वतरांगांचे प्रकरण आले. कोर्टाने या प्रकरणावर सुनावणी करण्यासाठी दुपारी 1 ची वेळ निश्चित केली. परिणामी, गत 3 वर्षांपासून कोर्टात खितपत पडलेले सत्तासंघर्षाचे प्रकरण



असेच पुढे ढकलण्यात आले आहे.

## कल्याण-डोंबिवली महापालिकेत मनसेच्या नगरसेवकांचा शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या निकालानंतर आता सत्तास्थापनेसाठी `हायव्होल्टेज` ड्रामा सुरू झाला आहे. ६२ या बहुमताच्या आकड्यापर्यंत पोहोचण्यासाठी फोडाफोडीच्या राजकारणाने टोक गाठले असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला राज ठाकरे यांच्या मनसेकडून पाठिंबा देण्यात आला आहे. शिंदेंच्या शिवसेनेने भाजप आणि ठाकरे गटाला धक्का देत, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेवर सत्ता स्थापनेसाठी एक पाऊल पुढे टाकले आहे.काही दिवसांपासून मनसे आणि शिंदेंच्या शिवसेनेच्या युतीच्या चर्चा सुरु होत्या. मात्र, आजपर्यंत त्याबाबत कोणत्याही पक्षाने अधिकृत भाष्य केले नव्हते. मात्र, आज बुधवारी मनसेचे ५ आणि एकनाथ शिंदे यांचे ५३ नगरसेवक एकाचवेळी गट नोंदणीसाठी कोकण विभागीय



आयुक्तांच्या कार्यालयात पोहोचले होते. यावेळी मनसेचे ५ आणि एकनाथ शिंदे यांचे ५३ नगरसेवकांनी गट देखील स्थापन केला.

मंगळवारी रात्री उशिरा शिंदेसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे आणि मनसेचे राजू पाटील यांची बैठक झाली होती. या बैठकीत कल्याण डोंबिवली महापालिकेत सत्तास्थापनेचे आणि महापौर पदाची सूत्रे ठरली आहेत. त्यानंतर आज कोकण आयुक्त कार्यालयात श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के, राजू पाटील यांचा एकत्रित फोटो समोर आला. हा फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. यावेळी खासदार श्रीकांत शिंदे यांनी मनसेने शिंदे सेनेला पाठिंबा दिल्याचे सांगितले.

याबाबत शिंदेसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले की, आज ५३ नगरसेवकांसह आम्ही गट नोंदणी करायला आलोय. कल्याण डोंबिवलीत महायुतीसोबत मनसे आल्याने आमची ताकद वाढली आहे. याठिकाणी शिवसेना-भाजपा-मनसे एकत्रित येऊन महायुती सत्ता स्थापन करणार आहोत. विकासासाठी जे आमच्या सोबत येतील त्यांचे स्वागत आहे. ठाकरे सेनेने पाठिंबा दिला तरीही त्यांचे स्वागत आहे. उल्हासनगरमध्येही वंचित बहुजन आघाडीचे २ नगरसेवक यांनी आम्हाला पाठिंबा दिला

# कोल्हापूरचा महापौर शिवसेनेचाच होणार

## निवडणुकीत आम्ही मोठा त्याग केलाय, आमदार राजेश क्षीरसागरांचा दावा

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

महापालिका निवडणुका पार पडल्या आणि आता महापौर पदासाठी महायुतीच्या घटक पक्षांमध्ये रस्सीखेच सुरू असल्याचे दिसत आहे. मुंबईत मोठा वाद सुरू असतानाच आता कोल्हापुरात महापौर शिवसेनेचाच होईल, असा विश्वास शिवसेना शिंदे गटाचे आमदार राजेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.



शिवसेना शिंदे गटाचे आमदार राजेश क्षीरसागर यांनी म्हटले की, कोल्हापुरात महापालिकेत महायुती म्हणून निवडणुका व्हाव्यात असा माझा प्रामाणिक हेतू होता. युतीमध्ये कोणताही मिठाचा खडा पडू नये यासाठी माझ्या प्रयत्न आहे. या निवडणुकीत शिवसेनेने मोठा त्याग केला आहे. विधानसभेत कोल्हापूर उत्तरची प्रत्येक पेठ शिवसेनेसोबत होती, याची पुनरावृत्ती महापालिका निवडणुकीतही झाली. या निवडणुकीत भाजपला 26, शिवसेनेला 14, राष्ट्रवादीला 4 आणि जनसुराज्यला 1 अशा 46 जागा आल्यामुळे नैसर्गिक हक्काने कोल्हापूरचा महापौर हा शिवसेनेचाच होईल, असे क्षीरसागर म्हणाले.

पुढे बोलताना राजेश क्षीरसागर म्हणाले, निगेटिव्ह नरेटीव्ह सेट करणाऱ्या बादशहांनी पुन्हा एकदा शिवसेना आणि कॉंग्रेस एकत्र येणार असा नरेटीव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला. मात्र, याबाबत शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मी देखील भूमिका स्पष्ट करतो. कोल्हापूर महापालिकेत महायुती म्हणूनच सत्ता स्थापन करू. 23 जानेवारीला शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची शंभरावी जयंती आहे. बाळासाहेब ठाकरे यांची कोल्हापूर महापालिकेवर भगवा फडकवण्याची इच्छा आज पूर्ण होत आहे.

राजेश क्षीरसागर म्हणाले, कोल्हापूरात महापालिका निवडणुकीत महायुतीच्या विजयात शिवसेनेने महत्त्वाचा वाटा उचलला. महायुतीच्या माध्यमातून निवडणूक व्हावी यासाठी सुरवातीपासून माझा प्रामाणिकपणे प्रयत्न होता. महायुतीत कोणत्याही प्रकारचा मिठाचा खडा पडू नये यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न केला. जागा वाटपात शिवसेनेने मोठा त्याग केला आहे. त्यांनी सांगितले की, `उत्तर'ची सर्व पेठ शिवसेनेबरोबर थेट हे विधानसभेत पाहिले होते. ते आता महापालिका निवडणुकीत पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. 20 पैकी 16 प्रभागात महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत.कसबा बावड्यात पराभूत झालेल्या आमच्या उमेदवारांनी आज माझी भेट घेतली. कसबा बावड्यात बोगस मतदान कसे नोंदवले जाते, दादागिरी कशी चालवली जाते, याची माहिती त्यांनी मला दिली, अशी माहिती राजेश क्षीरसागर यांनी दिली. तसेच त्या ठिकाणी आमचे उमेदवार पराभूत झाले असले तरी विजय आमचा आहे. बोगसगिरी करून शेवटी मी फार मोठा शहाणा आहे.

## शिवसेना सत्तासंघर्षावर शुक्रवारीही सुनावणी होणार नाही:असीम सरोदे यांचा SC चा दाखला देत दावा; सुनावणी 4 आठवड्यांनी होण्याचे संकेत

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

शिवसेनेच्या सत्तासंघर्षाची सुप्रीम कोर्टातील आजची सुनावणी पुन्हा लांबणीवर टाकण्यात आली. ही सुनावणी परवा म्हणजे शुक्रवारी 23 जानेवारी रोजी होणार असल्याची माहिती आहे. पण विधिज्ञ असीम सरोदे यांनी ही सुनावणी शुक्रवारी होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचा दावा केला आहे. कोर्टाने प्रस्तुत प्रकरणात अद्याप कोणतीही तारीख दिली नाही. या प्रकरणी 4 आठवड्यांनंतर एखाद्या दिवशी सुनावणी होईल, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे शिवसेना खटल्याची सुनावणी शुक्रवारी होणार किंवा नाही याविषयी साशंकता निर्माण झाली आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वातील खंडपीठापुढे आज शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्ष व चिन्हाशी संबंधित वादावर सुनावणी होणार होती. हे प्रकरण कोर्टात 37 व्या क्रमांकावर लिस्टेड होते. त्यावर सकाळच्या सत्रात 11.30 वाजता सुनावणी सुरू होऊन ती सलग 2 दिवस चालणे अपेक्षित होते. पण आज अचानक कोर्टापुढे अरावली पर्वतरांगांचे प्रकरण आले. कोर्टाने या प्रकरणावर सुनावणी करण्यासाठी दुपारी 1 ची वेळ निश्चित केली. परिणामी, गत 3 वर्षांपासून कोर्टात खितपत पडलेले सत्तासंघर्षाचे प्रकरण असेच पुढे ढकलण्यात आले.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, शिवसेना व राष्ट्रवादीशी संबंधित या प्रकरणावर येत्या शुक्रवारी सुनावणी होण्याची शक्यता आहे. पण असीम सरोदे यांनी हा दावा जोरकसपणे फेटाळले आहे. तसेच हे प्रकरण सतत लांबणीवर टाकले जात असल्यावर नाराजीही व्यक्त केली आहे. ते म्हणाले, आज सर्वोच्च न्यायालयातील सत्ता संघर्ष सुनावणी पुढे ढकलली जाणार हे मला कालच माहिती असल्याने मी आज दिल्लीला गेलो नव्हतो.

शिवसेना सत्तासंघर्ष प्रकरणामध्ये कोणतीही नक्की तारीख दिलेली नाही. कुणीतरी पसरविले की 23 जानेवारी या तारखेला सुनावणी आहे. मला सुद्धा एका कार्यक्रमात असताना हीच काही चॅनेल वरील चुकीची माहिती कळली. परंतु याप्रकरणात कोणतीही तारीख अजून दिलेली नाही. चार आठवड्यांनी कोणतीतरी तारीख होईल.

कृपया याची नोंद घ्यावी की तारखेबाबत विनंती ऐकून घेण्यास सुद्धा सुप्रीम कोर्टाने नकार दिला आणि फॉर विक्स असे म्हणून कोर्टाचे कामकाज संपले. त्यामुळे नक्की तारीख



व्हायची आहे, असे असीम सरोदे यांनी म्हटले आहे. असीम सरोदे यांच्या या विधानामुळे शिवसेनेच्या पुढील सुनावणीविषयी साशंकता व्यक्त केली आहे.

## कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर आणि ठाण्यात महायुतीचाच महापौर, रवींद्र चव्हाणांची माहिती

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, ठाण्यात महायुतीचाच महापौर होणार अशी माहिती समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोस दौऱ्यावरुन आल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक होणार आहे. त्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याचे समजते. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि एकनाथ शिंदे यांची या तिन्ही महानगरपालिकांमध्ये महायुतीचा महापौर होण्यासंदर्भात यापूर्वीच झालेल्या भेटीत सविस्त्र चर्चा झालेली आहे. तिन्ही महानगरपालिकेमध्ये महायुतीला जनादेश मिळाला आहे



त्यामुळे या जनादेशानुसारच तीनही महानगरपालिकेत महायुतीची सत्ता स्थापन होणार असल्याची माहिती भाजप प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिली आहे.

दरम्यान, कल्याण डोंबिवली महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे आणि माजी आमदार राजू पाटील यांनी शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेतली होती.

# अजित काका, माझ्या शाळेत पाणीही नाही: बीडमधील ZP शाळेची दयनीय अवस्था; विद्यार्थिनीने पत्रातून उपमुख्यमंत्र्यांकडे मांडली व्यथा

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

बीड जिल्ह्यातील परभणी केसापुरी गावातून समोर आलेल्या एका घटनेने संपूर्ण राज्याचं लक्ष वेधलं आहे. येथील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या अंकिता कवचट या विद्यार्थिनीने थेट राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांना पत्र लिहून शाळेतील गंभीर समस्यांकडे लक्ष वेधले आहे. एका लहानशा गावातील विद्यार्थिनीने थेट सत्तेच्या सर्वोच्च स्तरापर्यंत आपली व्यथा पोहोचवल्यामुळे या घटनेची सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे. हे पत्र सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून, त्यामुळे प्रशासनासमोर अनेक अस्वस्थ करणारे प्रश्न उभे राहिले आहेत.

अंकिताने आपल्या पत्रातून शाळेची दयनीय अवस्था अत्यंत स्पष्ट शब्दांत मांडली आहे. तिने लिहिलं आहे की, शाळेत पिण्याच्या स्वच्छ पाण्याची योग्य सोय नाही. स्वच्छतागृहांची अवस्था खराब असून अनेक वेळा ती वापरण्यायोग्य नसतात. वर्गखोल्यांची दुरवस्था झाली आहे, छत गळते, भिंतींना तडे गेले आहेत आणि विद्यार्थ्यांना बसण्यासाठीही नीट व्यवस्था नाही. जमिनीवर बसून शिक्षण घ्यावं लागत असल्याने अनेक विद्यार्थ्यांना आरोग्याच्या तक्रारी भेडसावत असल्याचाही उल्लेख तिने केला आहे.

पत्रात आणखी गंभीर बाब समोर आली आहे. कागदोपत्री शाळेला खेळाचे साहित्य, पाणी फिल्टर, प्रोजेक्टर, शैक्षणिक साहित्य उपलब्ध असल्याचे दाखवले जाते. मात्र प्रत्यक्षात हे साहित्य शाळेत अस्तित्वातच नसल्याचा आरोप अंकिताने केला आहे. शासनाच्या योजनांमधून आलेल्या सुविधांचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याचं तिने नमूद केलं आहे. शिक्षक प्रयत्न करत असले तरी मूलभूत सुविधांच्या अभावामुळे शिक्षण प्रक्रिया अडचणीत येत असल्याचं तिच्या पत्रातून स्पष्ट होतं.

एका विद्यार्थिनीने एवढ्या धाडसाने आवाज उठवणं हे निश्चितच कौतुकास्पद असल्याचं अनेक नागरिकांचं म्हणणं आहे. सोशल मीडियावर अनेकांनी अंकिताचं अभिनंदन करत तिच्या धाडसाचं कौतुक केलं आहे. मात्र याच पत्रामुळे ग्रामीण भागातील शाळांची खरी परिस्थिती पुन्हा एकदा समोर आली आहे. अनेक ठिकाणी अजूनही शाळा केवळ नावापुरत्या चालतात का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शिक्षण हा मूलभूत हक्क असताना विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधांसाठीही संघर्ष करावा लागतो, ही बाब चिंताजनक असल्याचं मत व्यक्त केलं जात आहे.

या प्रकरणाबाबत गावच्या सरपंच प्रतीक्षा शिंदे यांना विचारणा केली असता त्यांनी वेगळीच प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या की, आमच्या गावातील विद्यार्थ्यांना पंतप्रधान आणि उपमुख्यमंत्री कोण आहेत, हे माहीत आहे, हाच आमच्या गावचा विकास आहे. विद्यार्थिनीने थेट उपमुख्यमंत्र्यांना



पत्र लिहिणं ही बाब सकारात्मक असून या प्रकरणाची सखोल चौकशी व्हायला हवी, असंही त्यांनी सांगितलं. तसेच त्या विद्यार्थिनीला भेटून तिच्या अडचणी समजून घेणार असल्याचं आश्वासनही त्यांनी दिलं आहे.